कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

## छगन भुजबळ नाराज

**मुंबई :** मंत्रिमंडळातून डच्चू देण्यात न आल्याने छगन भुजबळ यांनी आपली नाराजी बोलून दाखवली. भुजबळांसह दिलीप वळसे-पाटील, सुधीर मुनगंटीवार, अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर यांनाही मंत्रिमंडळातून नारळ देण्यात आला आहे. दरम्यान, नाराज भुजबळांनी प्रसार माध्यमांशी बोलताना मी नाराज आहे, दादांसोबत कालपासून चर्चा केलेली नाही. मला ते गरजेचं वाटत नाही. मी एक सामान्य कार्यकर्ता, मला डावललं काय, फेकलं काय, काय फरक पडतो. पण अशी किती मंत्रीपदं आली आणि गेली, पण छगन भुजबळ संपलेला नाही, अशी प्रतिक्रिया दिली.

## एकाच रात्रीत पाच दुकाने फोडली

**कर्जत :** कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कर्जत नगरपरिषद क्षेत्रात रविवारी (दि.१५) मध्यरात्री चोरट्यांनी एकाच परिसरातील पाच दुकाने फोडल्याने परिसरातील नागरिक भयभीय झाले आहेत. याबाबत कर्जत पोलीस ठाणे पुढील तपास करीत आहे.

सध्या थंडी पडत असल्याने थंडीचा फायदा चोरटे घेत असल्याने दिवसागणिक चोरीच्या घटनेत वाढ होताना दिसत आहे. कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत नगर परिषद क्षेत्रात रेल्वे स्टेशनलाच लागून असलेल्या डेक्कन जिमखाना परिसरात रविवार, दि.१५ डिसेंबरच्या मध्यरात्रीनंतर पाच दुकाने चोरट्यांनी फोडली. •➤ पान २ वर

### तबलावादक झाकीर हुसैन यांचे निधन

# अलविदा उस्ताद



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आपल्या जादुई तबला वादनाने जगभरातील संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध करणारे प्रख्यात तबलावादक, संगीतकार आणि तालतज्ज्ञ, जागतिक पातळीवरचे ख्यातकीर्त, पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन (७३) यांचे रविवारी निधन झाले. त्याच्यावर सॅन फ्रान्सिस्कोमध्ये उपचार सुरू होते. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. हुसेन यांना हृदयाशी संबंधित समस्या जाणवू लागल्याने गेल्या आठवड्यातच सॅन फ्रान्सिस्को येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तबला नसांनसांमध्ये भिनलेला आणि रसिकांच्या हृदयात भिनवणारा कलावंत आज काळाच्या पडद्याआड गेला आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी कथक नृत्यांगना अँटोनिया मिनेकोला, मुली अनीसा कुरेशी आणि •➤ पान २ वर

**जन्म / 9 मार्च 1951**

### पुरस्कारांनी गौरव

उस्ताद झाकीर हुसेन यांना १९८८मध्ये पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण आणि २०२३ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. झाकीर हुसेन यांना तीन ग्रॅमी पुरस्कारही मिळाले होते. उस्ताद अल्ला रखा यांचे सुपुत्र असलेल्या झाकीर हुसेन यांनी तबल्याला जागतिक पातळीवर नेले. प्रयोगशीलता, वादन शैली व अंगभूत प्रतिभेमुळे झाकीर हुसेन यांनी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील जाणकार आणि जनसामान्य श्रोते अशा दोघांनाही तबला वादनाने मंत्रमुग्ध केले.

### या चित्रपटांतून अभिनय

उस्ताद झाकीर हुसैन संगीतकार, तबलावादक असण्याबरोबरच एक उत्कृष्ट अभिनेतेदेखील होते. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांनी १९८३ मध्ये शशी कपूर यांच्या 'हीट अँड डस्ट' चित्रपटातून इंडस्ट्रीत पदार्पण केले होते. त्यांच्या सोलो अल्बम 'मेकिंग म्यूझिक'मधून खूप लोकप्रियता मिळाली. 'हीट अँड डस्ट', 'साज', 'मंटो', 'मिस बीटीज चिल्ड्रन' अशा जवळपास १२ चित्रपटांमध्ये त्यांनी अभिनय केला. झाकीर हुसैन यांनी १९९७ मध्ये आलेल्या 'साज' चित्रपटात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या चित्रपटात शबाना आझमी यांनी झाकीर यांच्या प्रेयसीची भूमिका केली होती. या व्यतिरिक्त झाकीर यांनी अनेक चित्रपट केले. २०१२ मध्ये आलेल्या 'चालीस चौरासी'मध्येही ते झळकले होते. यंदा प्राइम व्हिडीओवर प्रदर्शित झालेल्या देव पटेलच्या 'मंकी मॅन' सिनेमातदेखील झाकीर हुसैन यांनी काम केलं होतं.

# आरटीओची हप्तेखोरी?

## अनधिकृत अवजड वाहतुकीला आशीर्वाद



संतोष पाटील
। पेण ।

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हप्तेखोरीमुळे सर्रास मुंबई-गोवा महामार्गावर वडखळ-अलिबाग मार्ग, पेण-खोपोली बायपास रोड यावर शनिवार व रविवार पाहिले तर मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड होत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र, याबाबत उपप्रादेशिक अधिकाऱ्यांना काही पडलेले नाही. कारण, मोठ्या प्रमाणात या कार्यालयात चालू असलेली हप्तेखोरी, त्या हप्तेखोरीच्याच आशीर्वादाने बिनधास्त ओव्हरलोड वाहतूक सुरू आहे, अशी चर्चा आहे.

प्रत्येक रस्त्याला एक क्षमता ठरलेली असते. त्या क्षमतेच्या वजनाएवढेच वाहन मालाची वाहतूक करू शकते. परंतु, मुंबई-गोवा महामार्गावर सर्रास ओव्हरलोड वाहतूक होत असल्याचे निर्दशनास आले आहे. त्यामुळे या महामार्गावर मोठे अपघात होऊन जीवितहानी होऊ शकते. त्यातच ही ओव्हरलोड करणारी वाहने आणि उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांचे असणारे घनिष्ठ संबंध यामुळे खड्ड्यांचे प्रमाण वाढलेले आहे. जेएसडब्ल्यू कंपनीत ३०० ते ३५० वाहने कॉईल (लोखंडी पत्रा) यांची वाहतूक करत आहेत. साधारणतः एका कॉईलचे वजन १८ टन, २० टन, २५ टन एवढे असते. मात्र, ही वाहने क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या कॉईल वाहून नेत असतात. एका गाडीमध्ये दोन-दोन कॉईल भरुन वाहतूक होत असते. ही वाहतूक रात्री १० नंतर सुरु होते. तसेच दिवसभर ही वाहने कंपनीच्या आजूबाजूला असलेल्या पंपामध्ये किंवा रिकाम्या जागांवर पार्किंग केलेली असतात. तसेच पेण-खोपोली बायपास रोडलादेखील सर्रास वाहने उभी असतात.

मधल्या काळात नागोठणे ते खारपाडा यादरम्यान महेशनामक एजंटकडून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाला वसुलीचे पैसे पोहचत होते. मात्र, आता पहाटे चार ते सातच्या दरम्यान ओव्हरलोड वाहतूक होत असून, प्रत्येक गाडीला वेगवेगळा सांकेतिक क्रमांक दिला असून, तो सांकेतिक क्रमांक दाखविल्यावर अधिकारी गाडी अडवत नाही, अशी खात्रीलायक माहिती आहे. अधिकाऱ्यांना तो सांकेतिक क्रमांक दाखविला असता, आपल्या हिस्स्याची मलई •➤ पान २ वर

### अधिकाऱ्यांची टाळाटाळ

ओव्हरलोड वाहतुकीसंदर्भात कृषीवलच्या प्रतिनिधींनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांना (८१०८४४९१५९) संपर्क करुन विचारणा केली असता, त्यांनी प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली. आपल्याला प्रतिक्रिया देण्यासाठी मला वरिष्ठांची परवानगी घ्यावी लागेल, असे सांगून ओव्हरलोड वाहतुकीवर बोलणे टाळले.

### गाडीमागे दोन ते अडीच हजार?

ही ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांना आरटीओकडून विशिष्ट प्रकारचे कार्ड दिले जातात. याबदल्यात अधिकाऱ्यांचे हस्तक गाडीमागे दोन ते अडीच हजार रुपये महिन्याला घेतात, अशी चर्चा आहे. ही ओव्हरलोड वाहने दिवसाला दोन-दोन फेऱ्या मारतात. विज्याभाई, संज्याभाई, अभिभाई, किरणभाई नामक अधिकाऱ्यांचे हस्तक म्हणून कार्डचे पैसे जमा करत असतात. तसेच कोळसा, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांकडून एका गाडीवाल्याकडून महिना १२ ते २२ हजारांपर्यंत अवैधरित्या हप्ता गोळा केला जात आहे. आरटीओकडून तालुकानिहाय नेमलेली माणसे महिन्याच्या महिन्याला या वाहनचालकांकडून हप्ता गोळा करतात, अशी चर्चा आहे.

# लेटलतीफ कर्मचाऱ्यांची 'पंचायत'



। पेण । प्रतिनिधी ।

तहसील कार्यालयानंतर तालुक्याचे महत्त्वाचे प्रशासकीय कार्यालय म्हणून पंचायत समिती कार्यालयाकडे पाहिले जाते. परंतु, गेली दोन ते अडीच वर्षे पेण पंचायत समिती कार्यालयाला पूर्णवेळ गटविकास अधिकारी नसल्याने या कार्यालयातील कर्मचारी खुशाल चेंडू झाले असून, त्यांना वरिष्ठांची भीतीच उरली नाही. अधिकारी, कर्मचारी वेळेवर येत नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे याचा परिणाम दैनंदिन कामकाजावर होऊन सर्वसामान्य लोकांची कामे रखडतात. या लेटलतिफ कर्मचाऱ्यांवर कारवाई कोण करणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

२४ फेब्रुवारी २०२० च्या शासन नियमानुसार पाच दिवसांचा आठवडा झाल्याने कार्यालयीन कामाच्या वेळा वाढल्या आहेत. शिपायासाठी ९.३० ते ६.३०, तर अन्य कर्मचाऱ्यांसाठी ९.४५ ते ६.१५ अशी वेळ कामाची आहे. परंतु, याचे अजिबात भान पेण पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांना नाही. मात्र, रविवारसोबत शनिवारची सुट्टीदेखील कर्मचारी हक्काने घेतात. परंतु, सकाळी साडेनऊ वाजता कार्यालयीन कामकाजाला सुरुवात होते, याचा मात्र विसर कर्मचाऱ्यांना पडतो. आमच्या प्रतिनिधीने ९ वाजून ५८ मिनिटांनी पेण पंचयात समिती कार्यालयाला भेट दिली असता गटविकास अधिकारी कक्ष बंद, बांधकाम विभाग बंद, पशुसंवर्धन विभाग बंद, शिक्षण विभागाची खोलीदेखील बंद स्थितीत अढळली. सामान्य प्रशासक विभागामध्ये कुणीही अधिकारी नव्हते. कृषी विभाग पूर्ण रिकामा, ग्रामपंचायत विभागामध्ये कनिष्ठ लिपिक वृशाली मोकल वगळता कुणीही कर्मचारी हजर नव्हते. आरोग्य विभागात अंधारच अंधार होता. मात्र शिपाई प्रमोद काकडे, •➤ पान २ वर

- **पंचायत समितीचा अनागोंदी कारभार**
- **अधिकारी-कर्मचाऱ्यांना वेळेचे भानच नाही**

### बोटावर मोजण्याएवढेच कर्मचारी हजर

पेण पंचायत समिती कार्यालयामध्ये बोटावर मोजण्याएवढे पाच कर्मचारी १० वाजून १० मिनिटांनी कार्यालयात हजर होते. बाकी कर्मचारी साडेअकरापर्यंत येत होते. याचाच अर्थ, कर्मचाऱ्यांना वरिष्ठांचा धाक उरलाच नाही, असेच म्हणावे लागेल. तसेच बायोमॅट्रिक मशीन कार्यालयात बसवलेली आहे, ती चालू स्थितीतदेखील आहे. मात्र, कर्मचाऱ्यांच्या हजेरीचा डेटा मशीनमध्ये कैद होऊ नये म्हणून त्या मशीनच्या वायर काढल्या आहेत. कृषीवलचे प्रतिनिधी १०.४५ वाजेपर्यंत कार्यालयात हजर होते; परंतु निम्याहून जास्तीचे कर्मचारी आलेच नव्हते.

# खासगी रस्त्यासाठी कांदळवनांची कत्तल

### अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी



। चिरनेर । प्रतिनिधी ।

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जेएनपीएने वनविभागाच्या मॅन्ग्रोज सेलकडे वर्ग करण्यात आलेल्या ८१५ जागेत खारफुटीची कत्तल करून अज्ञातांनी जवळपास ६०० मीटरचा रस्ता बनवण्याचे काम सुरू केले आहे. या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र लघु पारंपरिक मत्स्य कामगार संघटनेचे अध्यक्ष नंदकुमार पवार यांनी उरण तहसीलदार, वनविभागाच्या मॅन्ग्रोज सेलकडे केली आहे.

पर्यावरणवादी संस्थांच्या संघर्षानंतर मुंबई उच्च न्यायालयाने जेएनपीएला मॅन्ग्रोज वनाची जागा वनविभागाच्या मॅन्ग्रोज सेलकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २०२१ साली जेएनपीएने ८१५ हेक्टर जागा वनविभागाच्या मॅन्ग्रोज सेलकडे वर्ग करण्यात आली होती. त्यानंतर या जागेला संरक्षित वनांचा दर्जा देण्याची मागणी पर्यावरणवादी संस्थांनी संबंधित •➤ पान २ वर

# पीएनपी संकुलात रंगणार प्रभाविष्कार




। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी शैक्षणिक संकुलाद्वारे 'प्रभाविष्कार' या सांस्कृतिक सोहळ्याचे दि. १८ ते २१ डिसेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा ठाव घेऊन त्यांच्या अंतर्मनाचा वेध घेणारा व त्याचबरोबर सर्वांगीण विकासाला वाव देणाऱ्या कार्यक्रमांचे सादरीकरण या सोहळ्यात होणार आहे.

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या वेश्वी येथील क्रीडा संकुलात मंगळवार (दि.१७) डिसेंबरला क्रीडा ज्योत प्रज्वलित करून रॅलीला सुरुवात केली जाणार आहे. तसेच सकाळी साडेदहा वाजता गुणगौरव सोहळा होणार असून, यावेळी माजी आ. बाळाराम पाटील व पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

बुधवार (दि. १८) ते शनिवार (दि. २१) या चार दिवसांच्या कालावधीत प्रभाविष्कार सोहळा सायंकाळी साडेपाच ते रात्री नऊ यावेळेत रंगणार आहे. १८ डिसेंबरला पहिल्या दिवशी प्राथमिक, माध्यमिक मराठी शाळा व बीएड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम होणार आहेत. दुसऱ्या दिवशी १९ डिसेंबरला सीबीएससी होली चाईल्ड शाळा, २० डिसेंबरला होली चाईल्ड इंग्रजी माध्यम शाळा आणि २१ डिसेंबरला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा पार पडणार आहे. भव्यदिव्य स्वरुपात होणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे पीएनपी संकुलाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

- **१८ ते २१ डिसेंबरपर्यंत विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम होणार**
- **आज क्रीडा रॅलीचे आयोजन**
- **बाळाराम पाटील, चित्रलेखा पाटील राहणार उपस्थित**

# अपघातामध्ये दुचाकीस्वार जखमी

### आक्षी पुलानजीक भीषण अपघात

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली ते आक्षी पुलादरम्यान कार आणि दुचाकीचा अपघात झाला. या अपघातामध्ये दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून, दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. यामध्ये दुचाकीचे अक्षरशः दोन तुकडे झाले आहेत. ही घटना रविवारी (दि.१५) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील नारायण बागूल हे सध्या मुरूडमध्ये राहात आहेत. मुरूडमधील एका विद्यालयात ते शिक्षक म्हणून नोकरी करीत आहेत. शुक्रवारी (दि.१३) ते नाशिकला गेले होते. रविवारी (दि.१५) ते नाशिककडून मुरूडकडे येण्यास निघाले. नागावमार्गे रेवदंड्याकडून ते मुरूडला त्यांच्या कारने जात होते. रात्री दहा वाजण्याच्या सुमारास नवेदर बेली ते आक्षी पुलाजवळ आल्यावर समोरून एक दुचाकी आली. कार आणि दुचाकीची जोरदार धडक झाली. या धडकेत दुचाकी चालक सागर पाटील हा गंभीर जखमी झाला. तो कुरुळ येथील रहिवासी आहे. अलिबागमधील रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु आहेत. या अपघातात दुचाकीचा चेंदामेंदा झाला असून, कारच्याही पुढील भागाचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात मोटार अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

### रायगड पोलिसांचा अभिनव उपक्रम


# पुतळ्यांच्या रक्षणासाठी 'गुड मॉर्निंग पथक'

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

महापुरुषांसह देव, देवतांच्या पुतळ्यांची विटंबना रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या संकल्पनेतून गुड मॉर्निंग पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. समाजकंटकांवर नजर ठेवण्याचे काम या पथकाच्या माध्यमातून होणार आहे. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात हा उपक्रम सुरू केला आहे. पुतळ्यांची विटंबना करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी रायगड पोलिसांचा हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची आणि संविधान प्रतीची विटंबना समाजकंटकांनी केली. या घटनेनंतर रायगड पोलिसांनी अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक पावले उचलली आहेत. जिल्ह्यात तीनशेहून अधिक वेगवेगळ्या प्रकारची पुतळे आहेत. श्रद्धास्थान असलेल्या पुतळ्यांची विटंबना रोखण्यासाठी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या संकल्पनेतून गुड मॉर्निंग पथक सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्यात २८ पोलीस ठाणे आहेत. या पोलीस ठाण्यात हे स्कॉड उभारण्यात आले आहेत.

> "पुतळ्यांची विटंबना होऊ नये, समाजात तेढ निर्माण निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस ठाणे स्तरावर गुड मॉर्निंग पथक सुरु करण्यात आले आहे. सकाळी पाच ते सहा या वेळेत पथकाद्वारे जिल्ह्यातील पुतळ्यांची पाहणी केली जाते. पुतळ्याजवळ असलेल्या माथेफिरूंवर यातून लक्ष ठेवण्याचे काम या पथकाद्वारे करण्यात येईल."
>
> – सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड



**रायगड जिल्ह्यात २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत जवळपास तीनशेहून अधिक पुतळे उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, कान्होजी राजे आंग्रे यांच्यासह विविध नेत्यांच्या पुतळ्यांचा समावेश आहे.**

### कसे असेल पथकाचे काम

**गुड मॉर्निंग पथक प्रत्येक दिवशी पहाटे पाच वाजता पुतळा आणि परिसराची पाहणी करतील. दरम्यान, कोणी माथेफिरु अथवा समाजकंटकाने काही उपद्रव केला असेल, तर त्याविरोधात तात्काळ कार्यवाही करेल. तसा अहवाल सकाळी सहा वाजेपर्यंत संबंधित पोलीस ठाण्यात देण्यात येईल. या पथकामध्ये दोन पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश असेल.**

या स्कॉडमध्ये दोन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पोलीस ठाण्यातील हद्दीमधील वेगवेगळ्या पुतळ्यांची पाहणी पथकामार्फत केली जाते. सर्व पुतळ्यांची पाहणी करून ते पुतळे सुस्थितीत असल्याची माहिती पोलीस अधिक्षकांना दिली जाते. जिल्ह्यातील होणारी पुतळ्यांची विटंबना रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी हा प्रयत्न केला आहे. जिल्ह्यातील २८ गुड मॉर्निंग स्क्वॉडद्वारे समाजकंटकांवर नजर ठेवण्याचे काम केले जात आहे. पोलिसांच्या या उपक्रमामुळे समाजातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## विजेचा शॉक लागून इसमाचा मृत्यू

**कोलाड :** रोहा तालुक्यातील आंबेवाडी येथील गणेश नगर येथे रविवारी (दि.१५) सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास बाळाराम सखाराम तेलंगे (५३) रा. हेटवणे यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली. या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कोलाड पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार रविवारी आंबेवाडी येथील गणेश नगर येथे बाळाराम सखाराम तेलंगे विजेच्या खांबावर वाढलेल्या वेली काढण्यासाठी चढले असता त्यांना विजेचा शॉक लागला. त्या झटक्याने ते खाली पडले. त्यांना उपचारासाठी •➤ पान २ वर

## भीषण अपघातात ट्रेलरचालक ठार

**सुकेळी :** मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातांची मालिका संपण्याचे काही नावच घेत नाही. दररोज महामार्गावर कुठे ना कुठे तरी अपघातात घडत आहेत. त्यातच महामार्गावर अपघातासाठी अत्यंत धोकादायक खिंड अशी ओळख असलेल्या सुकेळी खिंडीच्या उतारावरती खैरवाडी स्टॉपच्या समोर ट्रेलर दुभाजकाला धडकून भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भयंकर होता की, त्यामध्ये ट्रेलर चालक जागीच ठार झाला. हा अपघात सोमवारी (दि.१६) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडला. याबाबत अधिक माहिती अशी की, कोलाड बाजूकडून •➤ पान २ वर

# पहिल्याच दिवशी विरोधक आक्रमक

## ईव्हीएम व बीड, परभणीतील मुद्द्यांवर विधानभवनच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी




। नागपूर । दिलीप जाधव ।

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी परभणी व बीडमधील घटनांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. संविधानाची विटंबना व सरपंचाची निर्घृण हत्या या दोन्ही घटना भाजपा सरकार आल्यानंतर घडल्या आहेत. परभणीत एका आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे. या घटना अत्यंत गंभीर असून, आंबेडकरी अनुयायी व राज्यातील जनतेत प्रचंड संताप आहे. सरकारने या मुद्द्यांवर उत्तर द्यायची तयारी दाखवावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेत परभणी व बीडच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष ज्या दिवशी चर्चा करण्यास सांगतील, त्या दिवशी चर्चा करू, असे आश्वासन दिले. त्यानंतर विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांना किडनॅप केल्याची माहिती पोलिसांना होती. पण, देशमुख यांची अत्यंत निर्घृण पद्धतीने हत्या करण्यात आल्यानंतर पोलीस सक्रीय झाले. भाजपा सरकार आल्यानंतर दलित व बहुजन समाजावर अत्याचार केले जात आहेत का? ईव्हीएम सरकारने राज्यात राजकीय हत्यासत्र सुरु केले आहे का? असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले.

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांना कोठडीत असताना पोलिसांनी प्रचंड हालहाल करून मारण्यात आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले असून, ही सरकार प्रायोजित हत्या आहे. याप्रकरणी सरकारवरच हत्येचा गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

परभणीच्या मुद्द्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, संविधानाची विटंबना केल्याप्रकरणी पवार नावाच्या इसमाला पोलिसांनी अटक केली असून, तो मनोरुग्ण असल्याचे सांगितले जाते. परंतु, तो व्यक्ती बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार प्रकरणी काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झाला होता. सरपंच संतोष देशमुख सुद्धा हिंदूच आहे, त्यांचे हातपाय कापले, मृत्यूनंतर त्यांच्या शरीरावर आरोपी नाचले, त्यांना काय म्हणणार. बांगलादेशातील हिंदू सुरक्षित नाहीत म्हणता, मग भारतातील हिंदुंच्या संरक्षणाचे काय, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. परभणी व बीडचे प्रकरण मारकडवडीच्या ईव्हीएम विरोधातील मुद्द्यावरून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न तर नाही, ना अशी शंका येते, असेही नाना पटोले म्हणाले.

विधानसभेच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यावर आंदोलन केले. ईव्हीएम हटाव व परभणी तसेच बीडच्या मुद्द्यांवर यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

### ही कसली वसुली?

**माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या बंगल्यावर वैभव नावाच्या मुलाला किडनॅप करून ठेवले आहे. ९ कोटी रुपयांसाठी त्याला किडनॅप केले असून, त्याच्याकडून ४.५ कोटी रुपये वसूल केले आहेत, बाकीच्या ४.५ कोटी रुपयांच्या वसुलीसाठी त्याच्यावर अत्याचार केले जात आहेत. ही कसली वसुली आहे? एवढे पैसे चव्हाणांकडे आले कुठून, असा प्रश्नही नाना पटोले यांनी विचारला आहे.**

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## विटंबना करणाऱ्यांना अटक करा



- **रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि बौद्ध बांधवांची मागणी**
- **पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गेंना निवेदन सादर**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची आणि संविधानाच्या प्रतीची विटंबना करण्यात आली. या घटनेचे पडसाद रायगड जिल्ह्यातदेखील उमटले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायींनी या घटनेचा निषेध व्यक्त केला असून, सोमवारी (दि.१६) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या तालुका शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन देण्यात आले. विटंबना करणाऱ्यांना तात्काळ अटक करा, त्यांना कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) अलिबाग तालुका शाखेचे अध्यक्ष प्रमोद गायकवाड, परशुराम ओव्हाळ, पांडुरंग मोरे, विजय गायकवाड, मिलिंद जाधव, शुभांगी जाधव, दत्तात्रेय वाघपंजे, विलास गायकवाड, जयवंत सुर्वे, संचिता गायकवाड, सविता ओव्हाळ, अंजली गायकवाड, विकास जाधव, प्रवीण मोरे, तुषार जाधव, नथुराम जाधव, दत्तात्रेय जाधव, कैलास वाघमारे, दिवेश जाधव, रितेश पाटील, रोशन सोनावणे आदींसह बौद्ध बांधव, महिला, भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समिती, बहुजन हिताय बहुजन सुखायचे पदाधिकारी उपस्थित होते. आरपीआय (आठवले) च्या तालुका शाखेच्यावतीने पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले. दरम्यान, सुरुवातीला अलिबागमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्रिसरण व पंचशील घेण्यात आले.

## खंडित वीज, अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे करंजाडेकर हैराण

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

वारंवार खंडित होणारी वीज आणि अपुऱ्या प्रमाणात होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे करंजाडे वसाहतीमधील नागरिक हैराण झाले आहेत. सिडकोतर्फे विकसित करण्यात आलेल्या करंजाडे वसाहतीला विविध समस्यांनी ग्रासले आहे.

जवळपास सहा सेक्टर असलेल्या या वसाहतीत ७८४ च्या आसपास रहिवाशी इमारती असून, वसाहतीची लोकसंख्या दीड लाखावर जाऊन पोहोचली आहे. वसाहतीत नव्याने इमारती उभारल्या जात आहेत. यामुळे लोकसंख्येत आणखी भर पडणार आहे. भविष्याच्या दृष्टीने वाढती लोकसंख्या लक्षात घेत सिडकोतर्फे केल्या जात असलेल्या पाणीपुरवठ्यात वाढ होणे अपेक्षित आहे. मात्र, असे होताना दिसत नसून, आहे त्याच लोकसंख्येला अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा केला जात आहे. याबाबत सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधला असता पाणी उपसा करणारे पंप खराब होत असल्याने पाणीपुरवठा करण्यात अडचण येत असल्याचे उत्तर सिडकोकडून देण्यात येत असल्याची माहिती करंजाडे नोड फ्लॅट ओनर्स वेलफेयर असोसिएशनचे चेअरमन चंद्रकांत गुजर यांनी दिली. गुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार पाण्यासोबत वसाहतीला केला जाणारा वीजपुरवठादेखील वारंवार खंडित केला जातो, वारंवारा खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसोबत व्यापाऱ्यांचेदेखील मोठे नुकसान होत आहे.

### सोमवारी पाच तासांपासून वीज गायब

**सोमवारी (दि. १६) वसाहतीमधील वीज जवळपास पाच तासांपासून गायब होती. ओएनजीसी वसाहतीजवळील वीजपुरवठा करणारी वाहिनी खंडित झाल्याने वीजपुरवठा बंद ठेवण्यात आल्याची माहिती महावितरण विभागाकडून देण्यात आली असून, वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी आणखी चार ते पास तासांचा कालावधी लागेल, अशी माहिती महावितरणकडून देण्यात आली.**

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,

अर्ज क्रमांक ८०/२०२४
जा.क्र. ७८९

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., अलिबाग
तर्फे वसुली अधिकारी श्री. लंकेश भगवान नागांवकर ... अर्जदार
विरुद्ध
२. श्री. दिपक रामचंद्र थळे
पत्ता :- मु.पो.मोठे शहापूर ता. अलिबाग, जि. रायगड
२.श्री. सुरेश नारायण पाटील ... जाब देणार
पत्ता :- मु.पो.मोठे शहापूर ता. अलिबाग, जि. रायगड
४, श्री. शिरीष दत्तात्रेय भगत
पत्ता :- मु.पो. मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि. रायगड

कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु. ८१,४५८/- साठीचा अर्ज.

ज्याअर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक मर्या., अलिबागतर्फे वसुली अधिकारी श्री. लंकेश भगवान नागांवकर यांनी दिनांक ३०-०७-२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ८१,४५८/- (अक्षरी रुपये एक्याशी हजार चारशे अठावन्न मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ब नुसार सर्व प्रतिवादीना पहिली नोटीस दिनांक ३०-०७-२०२४ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमीत करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व ३ बजावली गेली नाही. तसेच सर्व प्रतिवादीना दुसरी नोटीस दिनांक २३-०८-२०२४ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमीत करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व ३ बजाविली गेली नाही. त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक ०६-०१-२०२५ रोजी दिवसाचे दुपारी १२-३० वा. सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता.अलिबाग, जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्वीकारली आहेत असे गृहीत धरुन, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : १६-१२-२०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
सहायक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग

पान १ वरून

## एकाच रात्रीत पाच दुकाने फोडली

यामध्ये निर्मल पान शॉप, दीपक इंटरप्राईजेस, क्रिएटिव्ह फोटोशॉप समर्थ कृपा वडा स्टॉल आणि राधाकृष्ण जनरल स्टोअर्स या दुकानांचा समावेश आहे. या दुकानांमधील चिल्लर, कॅमेरे, सिगारेट पॅकेट चोरून नेली आहेत. कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी आणि कर्मचारी अज्ञात चोरट्यांचा तपास करीत आहेत.

## आरटीओची हप्तेखोरी?

पोहोच झाली आहे असे समजते. आणि ते अधिकारी त्या गाडीला अडथळा न करता पुढे जाण्यासाठी हिरवा कंदील दाखवतात, अशी चर्चा आहे.

उपप्रादेशिक परिवहन खात्याकडून आजच्या घडीला कर्मचारी कमी आहेत असे सांगून स्वतःची मान वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु, खरी परिस्थिती पाहता, कर्मचारी कमी असणे म्हणजेच मलईचा वाटा जास्त मिळणे असाच होतो. मात्र, हा गोरखधंदा उजळ माथ्याने अधिकाऱ्यांचे हस्तक करत आहेत. याला कुठेतरी चाप बसणे गरजेचे आहे. परंतु, असे सध्या तरी होईल असे चित्र दिसत नाही. कारण, अधिकाऱ्यांनी आपापल्या परीने धनलक्ष्मीचे दर्शन घ्यायचे ठरवले एवढे निश्चित.

## खासगी रस्त्यासाठी कांदळवनांची कत्तल

विभागाकडे केली होती. मात्र, तीन वर्षांच्या पाठपुरावाही करूनही या जागेला संरक्षित वनाचा दर्जा दिलेला नाही, याबाबत पर्यावरणवाद्याचा संघर्ष सुरू आहे.दरम्यान, दोन दिवसांपूर्वी अचानक वर्ग करण्यात आलेल्या ८१५ हेक्टर क्षेत्रावरील द्रोणागिरी नोड, जुना शेवा कोळीवाडा येथे शेकडो खारफुटीचे तुकडे करून ६०० मीटर लांब व पाच मीटर रुंदीचा रस्ता बनवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.सीआरझेडचे उल्लंघन करून अनधिकृतपणे बनविण्यात येत असलेल्या रस्त्यासाठी लाखो खारफुटींची कत्तल करण्यात आली आहे. त्याशिवाय तलावही आंतरभरती संवेदनशील झोनमध्ये खोदण्यात आले आहे. या अनधिकृत कामासाठी मोठ्या डंपर आणि जेसीबी मशीनचा वापर केला जात आहे. यामुळे समुद्रकिनाऱ्यावरील आंतर-भरतीचे क्षेत्र, खारफुटीचे जंगल हे माशांच्या प्रजातींचे प्रजनन आणि उगवणारे आणि पारंपरिक मासेमारी क्षेत्र मोठ्या प्रमाणावर नष्ट झाले आहे.

**आधीच ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटाचा सामना करीत आहोत. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी मदत करण्याऐवजी प्रोत्साहन देत आहेत. त्यातच अज्ञातांकडून कांदळवनाची खुलेआम कत्तल करुन रस्त्याचे काम सुरू आहे. याप्रकरणी तात्काळ फौजदारी कारवाई करुन जेसीबी, डंपरवर जप्तीची कारवाई करावी, अशी मागणी तहसीलदार, वनविभागाकडे करण्यात आली आहे.- नंदकुमार पवार, अध्यक्ष, महाराष्ट्र लघु पारंपरिक मत्स्य कामगार संघटना**

## अलविदा 'उस्ताद'

इसाबेला कुरेशी, भाऊ तौफिक कुरेशी, फजल कुरेशी आणि जगभरात विखुरलेला शिष्य परिवार आहे. उस्ताद झाकीर हुसेन यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबईत झाला. झाकीर हुसेन यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील माहीम येथील सेंट मायकल स्कूलमधून झाले. याशिवाय त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून ग्रॅज्युएशन केले. त्यांचे वडील उस्ताद अल्ला रक्खा खाँ यांच्याकडेच त्यांनी वयाच्या चौथ्या वर्षापासून तबल्याचे धडे गिरवले. त्यांनी वयाच्या सातव्या वर्षी पहिल्यांदा जाहीर वादन केले.

**ऐतिहासिक कामगिरी**

कौशल्यपूर्ण वादनाने आणि बुद्धिमत्तेमुळे ते भारतीय शास्त्रीय संगीतातल्या वादकांसाठी एक 'सर्जनशील' साथीदार होते. याबरोबरच झाकीर यांनी जाझ आणि जागतिक संगीतातही ठसा उमटवला. त्यांनी अनेक प्रसिद्ध वादकांसोबत जगभरात कार्यक्रम केले तसेच एकलवादनही केले. जॉन मॅकलॉघ्लिन, एल. शंकर आणि टी.एच. विनयक्रम यांच्याबरोबर त्यांनी 'शक्ती बँड' स्थापन करून संगीत क्षेत्रात इतिहास रचला. त्यांनी जगविख्यात दिग्दर्शकांच्या चित्रपटांसाठी पार्श्वसंगीत दिलं, तसंच काही चित्रपटांत अभिनयही केला.

## लेटलतीफ कर्मचाऱ्यांची 'पंचायत'

चंद्रकांत पाटील, चित्रा चवरकर हे तीन कर्मचारी वगळता पूर्ण कार्यालयामध्ये शुकशुकाट होता. ही सर्व स्थिती आमच्या प्रतिनिधीच्या कॅमेऱ्यामध्ये कैद झाल्यानंतर त्यांनी भ्रमणध्वनीवरुन गटविकास अधिकारी लता बबन मोहिते यांना संपर्क केला. त्यावेळी मोहिते यांनी सांगितले की, माझ्याकडे पेण पंचायत समितीची अतिरिक्त जबाबदारी असून, मी आठवड्यातून तीन दिवस पेण कार्यालयात असते. मी सर्व गैरहजर कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार कट करून त्यांना कारणे दाखवा नोटीस देणार. उद्या मंगळवारी ११.३० वाजता आपण कार्यालयात यावे, मी केलेल्या कारवाईचा लेखी उत्तर आपल्याला देते.

## शॉक लागून इसमाचा मृत्यू

प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी येथे आणले. येथील डॉक्टरांनी तपासले असता त्यांना मृत घोषित केले. कोलाड पोलीस ठाण्यात त्यांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनास्थळी कोलाड पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते यांनी जाऊन याविषयी पंचनामा केला असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलीस ठाण्याचे अंमलदार एस.जी. मोरे अधिक तपास करीत आहेत.

## ट्रेलर चालक ठार

वाकणच्या दिशेने कंटेनर घेऊन जाणारा ट्रेलर क्र. एम.एच.४६ बी.एम. ६३३१ सुकेळी खिंडीच्या उतारावर आला असता चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे तो दुभाजकाला धडकला. त्यामुळे ट्रेलरवर असलेला कंटेनर १० ते १५ फूट अंतरावर उडून ट्रेलरदेखील पूर्णपणे पलटी झाला. दरम्यान, ट्रेलरचालक पवन शिवाजी जाधव (३३) हा केबिनमध्येच अडकून जागीच ठार झाला. सुदैवाने अपघात झाला त्यावेळी दुसरे कोणतेही वाहन तेथून जात नव्हते, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. या अपघाताची माहिती मिळताच वाकण टॅबचे कर्मचारी तसेच ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य मनोहर सुटे, किशोर नावले यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली व हायड्राच्या सहाय्याने ट्रेलरचालकाला केबिनमधून बाहेर काढण्यात आले. त्याला जिंदाल रुग्णालयाच्या रुग्णवाहिकेतून नागोठणे सरकारी रुग्णालयात नेण्यात आले. या अपघाताचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी करीत आहेत.

## दिघोडे-दास्तानफाट्यावर खुलेआम वृक्षतोड

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील दिघोडे-दास्तानफाटा रस्त्यावर एमआयडीसीची जलवाहिनी साकारण्याच्या नावाखाली खुलेआम शेकडो वृक्षांची तोड करण्यात येत आहेत. सतत वाहनांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर दादरपाडानजीक पोकलनने वृक्षे उद्ध्वस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. एकीकडे राज्य शासन संपूर्ण राज्यात शंभर कोटी झाडे लावण्याचा कार्यक्रम राबवित आहे. तर, दुसरीकडे उरण तालुक्यातील डोंगर पोखरून खासगी व संरक्षित प्रादेशिक वनातील वारेमाप वृक्षतोड थांबविण्यास अपयशी ठरलेले वन व महसूल खाते खासगी वृक्षतोड अधिनियमांतर्गत वृक्षतोडीला सर्रास चालना देत आहे.

दिघोडे-दास्तानफाटा रस्त्यावरील झाडे पोकलनने राजरोसपणे उद्ध्वस्त करून आजूबाजूला फेकली जात आहेत. याचे गांभीर्य वन विभागाने लक्षात घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी विविध स्तरातून करण्यात येत आहे. लाकडाचा धंदा करणारे अवैध ठेकेदार, आरा गिरणीमालक, लाकूड तस्कर, वन खात्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मालामाल करून खुलेआम वृक्षतोड करण्यात येत असल्याची चर्चा आहे.

डोंगर पोखरून माती काढण्यासाठी उरण तालुक्यातील लाखो वृक्षांची खुलेआम तोड झाली असून, अजूनही तेच होत आहे. पर्यावरण असंतुलन, ग्लोबल वॉर्मिंग, पर्जन्यमानातील घट, जमिनीची धूप असे दुष्परिणाम त्यामुळे वाढले आहेत. खासगी वृक्षतोड अधिनियमाचा कसा गैरवापर होतो. त्यातून वनाधिकारी व लाकूड व्यापाऱ्यांना होत असलेला फायदा याची वन, महसूल, पोलीस, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व पर्यावरण खात्याची उच्चस्तरीय शोध व अभ्यास समिती स्थापन करून सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे. मात्र, उरण व डोंगर परिसरात नियम फाट्यावर मारून या वृक्षांची तोड सुरू आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील निसर्ग संपदा धोक्यात आली आहे.

> **वृक्षतोडीच्या तक्रारी तर आम्हाला प्राप्त झालेल्या नाहीत. मात्र, आमच्या निदर्शनास जर कोणी वृक्षतोड किंवा उद्ध्वस्त करीत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर १९६४ च्या कायदा कलमांतर्गत कारवाई करण्यात येईल.**
>
> **– एन.जी. कोकरे,**
> **तालुका वनक्षेत्र अधिकारी, उरण**

## बाटलीबंद पाणी आरोग्यासाठी घातक

। उरण । वार्ताहर ।

तहान लागल्यावर घराबाहेर असताना साधारणपणे बहुतेक लोक बाहेर त्यांच्या आरोग्याचा विचार करून बाटलीबंद पाणी घेतात. ज्यावर 'मिनरल वॉटर' असे लिहिलेले असेल. सामान्यतः चांगल्या दर्जाची असल्याचा दावा करणाऱ्या कंपनीची सीलबंद पाण्याची बाटली २० रुपयांना मिळते. पण, हे बाटलीबंद पाणी तुमच्या आरोग्यासाठी विषापेक्षा कमी नाही याची तुम्हाला जाणीवही नसेल. बाटलीबंद पेय आणि मिनरल वॉटर आरोग्यासाठी घातक असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सरकारने अशा मिनरल वॉटरला 'हाय रिस्क' श्रेणीत ठेवले आहे. बाटल्यांमध्ये पॅक केलेल्या पाण्यात प्लॅस्टिकमधील रसायने मिसळू शकतात, जी आरोग्यासाठी हानिकारक असतात. बीपीए (बिस्फेनॉल ए) सारख्या बाटल्यांमध्ये असलेली रसायने, त्याच बाटलीमध्ये पाणी जास्त काळ ठेवल्यास फॅथलेट्स पाण्यात विरघळू शकतात. या रसायनांचे सेवन केल्यावर कर्करोग आणि इतर गंभीर आजार होऊ शकतात. सामान्यतः कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि पोटॅशियमसारखी या खनिजांची कमतरता असू शकते.

पनवेल महानगरपालिका, पनवेल
ई- निविदा सुचना
मलनिःस्सारण विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब - १ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रू) |
|---|---|---|---|---|---|
| १. | PMC/SEWERAGE /45/2024-25 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नवीन पनवेल, सेक्टर-१३, ए टाईप मधील मलःनिस्सारण वाहिन्यांचे नूतनीकरण करणे. | १,१२,३३,७०२.०० | १,१३,०००/- | १,१८०/- |
| २. | PMC/SEWERAGE /46/2024-25 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नवीन पनवेल, सेक्टर-१४, ई-१ टाईप मधील मलःनिस्सारण वाहिन्यांचे नूतनीकरण करणे. | ६३,३२,११०.०० | ६४,०००/- | १,१८०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र./पमपा/मल.वि./३६२४/प्र.क्र.१० व ११/१४७२/२०२४
दिनांक : १६/१२/२०२४

SD/-
अतिरिक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. आशा अनंत म्हात्रे व श्री. अनंत जनार्दन म्हात्रे रा. जासई, तालुका-उरण, जिल्हा- रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. श्रीकांत प्रल्हाद कुलकर्णी रा. बेलवडे बुद्रुक, तालुका-पेण, जिल्हा- रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली असुन तसा साठेकरार ही करण्यात आलेला आहे.

मिळकतीचे वर्णन- जिल्हा रायगड पोट तुकडी पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, ग्रुप ग्रामपंचायत बेलवडे बुद्रुक, मौजे बेलवडे बुद्रुक येथील गट नं. २६२/अ एकुण क्षेत्र ०-८५-०० हे.आर.चौ.मी. आकार रु. १-३६ पैसे मधील श्रीकांत प्रल्हाद कुलकर्णी यांचे मालकीचे व नावे असलेल्या ०-४०-०० हे.आर.चौ.मी. पैकी ०-२०-० हे.आर.चौ.मी. ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून ८ (आठ) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-२०-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड.
दि. १७/१२/२०२४.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील.**
परमार प्लाझा, शॉप नं. १६.
तळ मजला शिवाजी पथ.
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

निवडक

## आत्महत्याप्रकरणी अटक

**पनवेल :** पत्नीने केलेल्या आत्महत्या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी पती विकास रमेश यादव याला अटक केली. सिलिंग फॅनला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात विकास यादव, रमेश यादव, सीता यादव आणि कविता यादव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तालुका पोलिसांनी आरोपी पती विकास यादव याला अटक केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## वंचितने केला निषेध

**पनवेल :** परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ असलेल्या भारतीय संविधानाच्या शिल्पाची विटंबना करण्यात आली. या निंदनीय घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी करंजाडे शहरच्या वतीने पनवेल शहर पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले. यावेळी पनवेल तालुका वंचित बहुजन आघाडी महिला अध्यक्षा रोहिणी खरात, स्वप्नील पवार, नितीन कांबळे, गौतम अहिरे,बापू सावंत, दिगंबर साळवे, धनंजय ताटे आदी उपस्थित होते.

## मराठा फाऊंडेशनची मोहीम

**पाली/गोमाशी :** किल्ले सरसगड या किल्ल्याचे संवर्धन कार्य करत असलेल्या दुर्गवेध युवा मराठा फाउंडेशन या संस्थेची हिरक माहोत्सवी मोहीम किल्ले सरसगड येथे पार पडली. या मोहिमेत ८० गड सेवक सहभागी झाले होते. या मोहीम दरम्यान किल्ल्यावरील महत्त्वाच्या स्थानांना नामनिर्देशक फलक या मोहिमेत लावण्यात आले. त्याचबरोबर किल्ल्यावरील पहाऱ्याच्या चौकीच्या माती खाली गाडलेल्या अवशेषांचे उत्खनन करण्यात आले.

## दुचाकीला धडक २ जखमी

**पनवेल :** होंडा सिटी गाडीची दुचाकीस धडक बसल्याने झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोघेजण जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील गाढेश्वर मंदिराजवळ घडली आहे. संजय निरगुडा व गौरव भवर हे दुचाकी घेवून गाढेश्वर मंदिराजवळून जात असताना समोरुन आलेल्या होंडा सिटीवरील चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने त्याने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात संजय निरगुडा व गौरव भवर हे जखमी झाले आहेत.

## अंमली पदार्थ जप्त

**नवीन पनवेल :** नवी मुंबई हद्दीत अंमली पदार्थाची तस्करी करणारे व बेकायदेशीर राहणाऱ्या १६ अफ्रिकन नागरिकांना अटक करुन १२ कोटी रुपयाचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये अंमली पदार्थाची तस्करी करणारे व बेकायदेशीर राहणाऱ्या आफ्रिकन नागरिकांवर कारवाई करण्याबाबत आदेश दिलेले होते.वपोनि नितीन बडगुजर यांच्या टीमने ८,८२,००,००० रुपये किमतीचे कोकन जप्त केले आहे.

# मुरूड आगार समस्यांच्या गर्तेत

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

**मुरूड हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. परंतु याच मुरूडमधील एसटी बस आगार समस्यांच्या गर्तेत सापडल्याचे दिसून आले आहे. जुन्या गाड्यांसह स्थानक व आगाराच्या परिसरात गवत, काटेरी झुडपांनी विळखा घातला आहे. त्यामुळे प्रवाशांबरोबरच कर्मचाऱ्यांची सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**



रायगड जिल्ह्यातील मुरूड एक पर्यटनाच्यादृष्टीने महत्वाचे ठरत असताना, ऐतिहासिक ठिकाण म्हणून मुरूडची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. वर्षाला दोन लाखाहून अधिक पर्यटक मुरूडला भेटी देतात. येथील स्थानिक हॉटेल, कॉटेजेस, रेस्टॉरन्टबरोबरच अन्य स्थानिक व्यवसायिकांना रोजगाराचे साधन पर्यटनातून उपलब्ध होते. पर्यटकांची वर्दळ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात असते. मुरूडमध्ये पर्यटकांसह स्थानिकांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे एसटी बस आगार व स्थानक आहेत. या स्थानकातून मुंबईसह बोरीवली, ठाणे, स्वारगेट, पुणे अशा अनेक लांब पल्ल्यासह रेवदंडा, अलिबाग, रोहा अशा अनेक तालुका व गावांच्या ठिकाणी बसेस सोडल्या जातात. शाळा, महाविद्यालयामध्ये जाणाऱ्या येणाऱ्यांची संख्यादेखील प्रचंड आहे. प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे चित्र दिसून आले आहे. स्थानकासमोर बस पार्कींग न करता, कोपऱ्यात झाडाच्या बाजूला वाहने पार्कींग केली जात असल्याचे चित्र आहे. स्थानकात माती, खडी, धुरळा असून फलाटासमोरच झुडूप वाढलेले आहे. मुरूड स्थानकात प्रवेश करताना प्रवेशद्वारासमोर असलेल्या सुरक्षा रक्षकाच्या केबीनच्या परिसरात प्रचंड गवत वाढले आहे. कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासह आगाराच्या परिसराताला गवत, काटेरी झुडपांनी विळखा घातला आहे. समस्यांच्या गर्तेत सापडलेल्या आगारातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे. प्रभारी व्यवस्थापक याकडे लक्ष देतील का असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

### प्रभारी आगार व्यवस्थापकांनी बोलणे टाळले

याबाबत मुरूडचे प्रभारी आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी मोबाईलवर काहीच सांगू शकत नाही. त्यांनी प्रत्यक्ष या मग तुम्हाला याची माहिती दिली जाईल असे सांगून समस्यांच्या मुद्द्यावर बोलणे टाळणे.

### आगाराला पूर्णवेळ व्यवस्थापकाची प्रतीक्षा

मुरुड एसटी बस आगारात गेल्या दीड वर्षापासून पूर्ण वेळ व्यवस्थापक नाही. त्यामुळे या आगारात अलिबाग एसटी बस स्थानकातील वाहतूक निरीक्षक राहुल शिंदे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून मुरुड एसटी बस आगार व स्थानकाचा कारभार निरीक्षकाच्या भरोवश्यावर चालत आहे. या आगाराला पूर्ण वेळ व्यवस्थापकाची प्रतीक्षा लागून राहिली आहे. याकडे एसटी महामंडळ लक्ष देईल का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

> “एसटीबसमधील समस्या सोडविण्याच्या सूचना आगारातील अधिकाऱ्यांना केल्या आहेत. जो दोषी आढळून येतो. त्यांच्याविरोधात कारवाई केली जाते. आगारातील गवत, झुडूप काढण्यासाठी कर्मचारी अपुरे पडत आहेत. जे कर्मचारी आहेत. त्यांच्या मदतीने गवत व काटेरी झुडूप काढण्याचे काम करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचेही सांगितले आहे. प्रवाशांची गैरसोय होऊ नये याकडे लक्ष ठेवण्यास सांगितले आहे.
> दिपक घोडे - विभाग नियंत्रक, रायगड एसटी महामंडळ”



# माणगाव बसस्थानक नूतनीकरणासाठी दिड कोटी

- गैरसोयींचा फेरा लवकरच संपणार
- प्रवाशांना मिळणार सुविधांसह दिलासा

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव एसटी बस स्थानकाच्या नुतनी करणासाठी तब्बल दिड कोटी रुपये मंजूर झाले आहेत. त्यामुळे लाखो एसटी बस प्रवाशांना गैरसोयीचा फेरा संपणार असून त्यांना सर्वतोपरी सर्व सुविधा मिळणार आहेत. या मंजुरीमुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

या नूतनीकरणाची निविदा यापूर्वीच प्रसिद्ध झाली असून लवकरच हे काम सुरू होणार आहे. गेल्या वर्षी बसस्थानका समोरील सिमेंट कॉंक्रिटकरणासाठी १६ लाख रुपये खर्च आला आहे. तर दोन महिन्यांपूर्वी कॉंक्रिटीकरणासाठी १ कोटी २ लाख रुपये मंजूर झाले होते. त्यांचे कामही काही दिवसांनी पूर्ण होणार आहे. असे एकूण २ कोटी ६२ लाख रुपये मंजूर करून आणले आहेत. गेल्या २५ वर्षांपासून प्रवाशांना तुंबलेले पाणी, खाच खळगे आणि मोठमोठ्या खड्ड्यातून बस स्थानकात प्रवेश करावा लागत होता. यासाठी विविध सामाजिक संघटनांनी आंदोलन केले होते. हे खड्डे कायमस्वरूपी नष्ट होण्यासाठी या आवाराचे कॉंक्रिटीकरण करण्यासाठी आंदोलन केले होते.

त्यामुळे माणगाव बस स्थानकांच्या कॉंक्रिटीकरण आणि नूतनीकरण मंजूर झाले आहे. यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. या नूतनीकरणासाठी मंडळाने १ कोटी ४४ लाख ३७ हजार ३०३ रुपये मंजूर केले आहेत. या कामात गटारे, प्लास्टर, छप्पर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट, फर्निचर, आसन व्यवस्था, विविध कक्ष आदी सर्व प्रकारच्या सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. त्यामुळे हे स्थानक आधुनिक आणि सुसज्ज होऊन सुसाट धावणार आहे. हे बस स्थानक रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाणी असल्याने दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. तसेच हे बस आगार सतत एसटीला फायदा मिळवून देणारे आहे. या बस स्थानकासाठी ५० वर्षांपूर्वी माजी आमदार स्व. अशोक दादा साबळे प्रयत्न केले होते. त्याचे भूमीपूजन १९८१ मध्ये तत्कालीन बांधकाम राज्यमंत्री स्व. रविंद्र राऊत यांनी केले होते.त्यानंतर आगारासाठी त्यांनी उपोषण केले होते.

### दत्त दत्त ऐसे लागले ध्यान...

# कोपर येथे मोठ्या उत्साहात दत्तजयंती

। पनवेल । वार्ताहर ।

‘ दिगंबरा दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा’च्या जयघोषात शहरातील विविध दत्त मंदिरात जयंती उत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने कोपर येथील आर ४ येथील बळीराम धर्मा पाटील व शंकर धर्मा पाटील यांच्या दत्त मंदिरामध्ये सकाळपासून रांगा लागल्या होत्या. यावेळी पाटील परिवाराकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दत्त जयंतीनिमित्त कोपर येथील प्लॉट २२१ आर ४ येथील अपेक्स बिल्डिंगमध्ये बळीराम धर्मा पाटील, शंकर धर्मा पाटील व पाटील कुटुंबाकडून दरवर्षी दत्तजयंती मोठ्या उत्साहाने साजरी करतात. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी कोपर गावाचे पुनर्वसन झाले आहे. या बदल्यात आर ४ येथे विस्थापित केले आहे. यठिकाणी पाटील कुटुंबानी एकत्रित येत दुर्गा माता मंदिराची स्थापना केली. यावेळी दत्त गुरूंचीदेखील स्थापना केलेली आहे. यावेळी मंदिरामध्ये दत्तजयंती निमित्ताने दत्त मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. परंपरेप्रमाणे मंदिरात पहाटेपासूनच अभिषेक, आरती, महापूजा यासह जन्मकाळ सोहळा, आयोजन करण्यात आले होते. धार्मिक प्रथेप्रमाणे पहाटे दत्तमूर्तीला अभिषेक घालण्यात आला. अभिषेकानंतर गुरूंची महापूजा व आरती करण्यात आली. दुपारी बाराच्या दरम्यान आरती व दिवसभर भजन, कीर्तन व अन्य धार्मिक सोपस्कार पार पाडण्यात आले. यावेळी दत्त मंदिरात धार्मिक उपक्रम पार पडले असल्याची माहिती बळीराम पाटील यांनी दिली.

## रमेश चितळकर यांचे निधन

**खांब :** खांब गावचे रहिवासी रमेश विठ्ठल चितळकर यांचे गुरूवारी (दि.१२) वयाच्या ५९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन बहिणी, दोन मुले असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी शनिवारी (दि.२१) तर अंतिम धार्मिकविधी मंगळवारी (दि.२४)रोहा येथील श्रीयोग अव्हेन्स कल्पक सोसायटीच्या बाजूला पंचायत समिति रोड येथे होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## कुष्ठमुक्त सुरक्षित मोहिमेचा शुभारंभ

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र या मोहिमेचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या हस्ते सोमवारी (दि.१६) वरसोली येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. १६ ते २० डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणार असून, या मोहिमेतंर्गत वीटभट्टी, खाणकामगार, स्थलांतरित व्यक्ती, कारागृहातील कैदी, वृध्दाश्रम, अनाथाश्रम, वसतिगृहातील विद्यार्थी आदींची तपासणी केली जाणार आहे.

कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेतंर्गत नियमित सर्वेक्षणामध्ये कुष्ठरोगाच्या तपासणीपासून वंचित राहिलेल्या घटकांचे सर्वेक्षण, जनजागृती करुन, नवीन कुष्ठरुग्ण शोधून, मोफत बहुविध औषधोपचारांद्वारे संसर्गाची साखळी खंडीत करणे, हा उद्देश ठेवण्यात आला आहे. जिल्हाभरात ३७ हजार ५६८ इतक्या लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचा शुभारंभ वरसोली येथे करण्यात आला.

# कार्यशाळा म्हणजे निरंतर शिकण्याचे माध्यम

**पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे मत ; अलिबाग येथे पत्रकारांच्या कार्यशाळेला प्रतिसाद**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

विविध विभागांमार्फत आयोजित होणाऱ्या कार्यशाळा निरंतर शिकण्याचे माध्यम असतात, मात्र अनेकदा या कार्यशाळेबाबत लोकांचा दृष्टीकोन उदासिनतेचा असतो. ज्यावेळी आता मला काहीही नवीन शिकण्याची गरज नाही, मी परिपूर्ण आहे, मला सगळे येत असे एखाद्या व्यक्तीला वाटू लागते. तेव्हापासून त्याच्या ऱ्हासाला सुरूवात होते. त्यामुळे निरंतर शिक्षण घेत राहणे ही काळाची गरज आहे, असे मत रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी अलिबाग येथे व्यक्त केले. ते अलिबाग प्रेस असोसिएशनच्या माध्यमातून आयोजित पत्रकार कार्यशाळेत बोलत होते.

चिंतामणराव केळकर विद्यालयात आयोजित या कार्यशाळेच्या उद्घाटन सोहळ्याला आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, जेष्ठ पत्रकार कुमार कदम उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील शंभरहून अधिक पत्रकारांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला.



सोमनाथ घार्गे म्हणाले, या जगात परिपुर्ण असे कोणीही नसते. ज्या व्यक्तीला प्रगती करायची असेल, त्यांना पुढे जायचे असेल, जगामध्ये काही चालले आहे, याची माहिती असणे गरजेचे आहे. काहीतरी नवीन शिकायची गरज असते, पत्रकारीतेची साधने बदलत आहेत. त्यात गतीमानता येत आहे. त्यामुळे पत्रकारीतेतील बदल समजून घ्यायचे असतील तर त्यासाठी कार्यशाळा उपयुक्त ठरतात असेही घार्गे यांनी व्यक्त केले.

पत्रकार हा समाजातील महत्वाचा घटक आहे. समाजातील वेगवेगळ्या लोकांचे भेटून, त्यांचे प्रश्न मांडण्याचे काम ते करत असतात. पत्रकारांनी मांडलेल्या प्रश्नामुळे समाजात जागरुकता निर्माण होते. त्यामुळे पत्रकारीतेचे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून असलेले महत्व नाकारता येणार नाही. सुजाण आणि सक्षम समाज घडवायचा असेल तर त्यासाठी जाणते पत्रकार निर्माण व्हायला हवेत. त्यासाठी पत्रकारांच्या कार्यशाळा उपयुक्त ठरू शकतात असे मत आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांनी व्यक्त केले. आपत्ती काळात रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी प्रशासनाला मोलाची साथ दिल्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे यांनी यावेळी सांगितले. तर ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम पत्रकारीतेच्या बदलत्या स्वरुपाबाबत यावेळी भाष्य केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार वैभव चाळके यांनी बातमीची भाषा आणि व्याकरण याबाबत मार्गदर्शन केले. तर दुसऱ्या सत्रात मुंबई मराठी पत्रकारसंघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी पत्रकारीतेच्या जगभरात असलेल्या संधी कशा हेरता येऊ शकतात याबाबत पत्रकारांशी संवाद साधला. कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रात मानसोपचारतज्ञ डॉ. सागर मुंदडा यांनी मनातील ताणतणावाचे व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या शेवटी पत्रकारांना चिंतामणराव केळकर विद्यालयाचे अध्यक्ष अमर वार्डे आणि आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर यांनी तर आभार सचिव राजेश भोस्तेकर यांनी व्यक्त केले. तसेच सूत्रसंचलन महेश पोरे आणि भारत रांजणकर यांनी केले.

# कर्जतकरांचे साखळी उपोषण सुरु

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जत नगरपरिषद हद्दीतील नागरी समस्या तशाच आहेत, समस्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. याविरोधात शहरातील नागरिकांनी १६ डिसेंबरपासून बेमुदत उपोषणास बसले आहेत.

कर्जत नगरपरिषद नगरसेवक आणि नगराध्यक्ष यांचा कार्यकाळ संपल्याने मुख्याधिकारी वैभव गारवे प्रशासक म्हणून कारभार पाहत आहेत. नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराविरुद्ध गेल्या चार महिन्यांपासून निवेदन, चर्चा करून तसेच नगरपरिषदेला योग्य ती मुदत देऊनसुद्धा नागरी समस्या सुटल्या नाहीत. मुख्याधिकारी निष्क्रिय अधिकारी असल्याचा ठपका ठेवत तसेच कर्जत नगरपरिषद प्रशासनाविरुद्ध आज सोमवारी (दि.१६) पासून बेमुदत साखळी उपोषण आंदोलन येथील स्थानिक नागरिकांनी पुकारले आहे.




### काय आहेत कर्जतकरांच्या समस्या..!

**नागरिकांना शुद्ध आणि नियमित पाणी मिळावे, शहरात सीसीटीव्ही प्रणाली कार्यान्वित करणे, डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियमित फवारणी करणे, शहरातील कचरा वेळेवर उचलणे, शहरात एक्स्प्रेस फीडर बसवणे, रस्त्यात अडथळा निर्माण करणारे पोल हटवणे, पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी कठोर पावले उचलावी, पाण्याच्या पाईपलाइनचे नियोजन करणे, फुटपाथवरील अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करणे, बेकायदेशीर हातगाड्यांवर कारवाई करणे. सेंद्रिय कचऱ्याचा पुनर्वापर होऊन पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीसाठी बायोगॅस प्रकल्प त्वरित सुरू करावा. उल्हास नदी स्वच्छतेचे नियोजन करून कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे अशा अनेक मागण्या कर्जतकरांच्या आहेत.**



# ‘उष:काल संगीत रजनी’ने कर्जतकर मंत्रमुग्ध

। कर्जत । वार्ताहर ।

श्री दत्त जयंती निमित्त विठ्ठलनगरमधील यशोदत्तमध्ये असलेल्या श्री दत्त मंदिरात जन्म सोहळा झाल्यानंतर रात्री संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. कर्जतमधील उष:काल मराठी वाद्यवृंदच्या कलाकारांनी गीते सादर करून कर्जतकरांना मंत्रमुग्ध केले.

एकापेक्षा एक सरस गीते आनंद कुलकर्णी, मिहीर दुसाने, स्नेहा गोगटे, श्रीरंग वैद्य, आरती भालेराव या गायकांनी सादर केली. त्यांना ढोलकीवर धनंजय बेडेकर, केतन गडकरी, तबल्यावर कौशिक वांजळे, हार्मोनियमवर सुयोग ओक, ताल वाद्यावर संतोष माडगूळकर, उज्वल शिंदे यांनी साथ संगत दिली. सूत्रसंचालन प्रसिध्द अभिनेत्री जुई गडकरी यांनी केले. याप्रसंगी सुधीर पुराणिक, प्रकाश पटवर्धन, दिलीप गडकरी, शरद सरोदे, आशा गडकरी, मिता कारखानीस, नेत्रा गडकरी, विशाल गोरेगावकर, स्वप्ना अय्यर, सीमा गडकरी आदींसह कर्जतकर उपस्थित होते.

### ध्येयवेड्या आशुतोष जोशीची धडपड

# कोकणच्या निसर्ग संवर्धनासाठी पदयात्रा

। बोर्लीपंचतन । मकरंद जाधव ।

**परमेश्वराला पडलेलं सुंदर स्वप्न म्हणजे निसर्ग सुंदर कोकणची रम्यभूमी. एका बाजूला अथांग सिंधूसागर आणि दुसऱ्या बाजूला खडा पहारा देणारा काळाभिन्न सह्याद्री यांच्यामधला भूभाग म्हणजे अप्रतिम निसर्ग सौंदर्याचं लेणं ल्यायलेला आणि जैवविविधतेने नटलेला सुंदर प्रदेश कोकण.**

पण गेल्या काही वर्षात विकासाच्या नावाखाली कोकणच्या निसर्गसौंदर्याचं विद्रुपीकरण होत चाललं आहे. इथल्या कोकणी माणसाला विकास हवा पण तो कोकण भकास करणारा नसावा.अशक्यप्रय वाटणारी रेल्वे डोंगर दऱ्यातून कोकणात पोहोचली पण त्या रेल्वेचा कोकणी माणसाला किती फायदा होतोय? कोकण किनारपट्टीवरच्या गावांचा पर्यटनाच्या माध्यमातून विकास करण्यासाठी रेवस ते रेड्डीपर्यंत प्रस्तावित सागरी महामार्गाची आखणी करण्यात येत आहे. परंतु हा मार्ग कोकणवासीयांसाठी आहे की येथे येणाऱ्या कारखान्यांसाठी आणि उद्योगपतींसाठी? कारण इथली हजारो एकर मोक्याची जमीन राजकीय वरदहस्ताने आधीच विकली गेली आहे. काही जमिनी मजबुरीने त्यांना विकायला भाग पाडल्या त्यामुळे कोकणी माणसाला यातून काय मिळणार? विकास नको आहे असं नाही तर विकासाची व्याख्या कोकणी माणसाला ठरवू द्या. कोकणचं निसर्ग सौंदर्य उध्वस्त करणारे विनाशकारी प्रकल्प नको तर इथला निसर्ग जपणारे उद्योग म्हणजेच शेती येथे पिकणाऱ्या आंबा,काजू आणि विविध फळप्रक्रिया उद्योग, मसाले उत्पादनं, नारळाच्या झाडापासून निर्माण होणारा काथ्या किंवा तत्सम उद्योग, मत्स्य प्रक्रिया उद्योग व त्यासाठी शीतगृह त्याचबरोबर संपूर्ण किनारपट्टीवर पर्यटनपुरक व्यवसाय अशा विविध माध्यमातून कोकणचा विकास साधला जाऊ शकतो. मात्र निसर्गाच्या विरोधात असलेल्या विकासाबद्दल लोकांना काय सांगण्यात आलयं? याबाबत




त्यांचं काय मत आहे? अशा अनेक प्रश्नांबरोबरच येथील जल, जंगल, संपत्ती पर्यायाने निसर्गाचं संवर्धन आणि जनजागृतीसाठी चिपळूण येथील आशुतोष जोशी या ध्येयवेड्या तरुणाने रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डीपर्यंत होणाऱ्या ४९८ किलोमीटरच्या सागरी महामार्गाच्या पदयात्रेला अलिबागमधील रेवस येथून सुरुवात केली आहे. या प्रस्तावित सागरी महामार्गाच्या किनारपट्टीवरील गावांना भेट देत गावकऱ्यांचीत मतं जाणून येथील निसर्गाच्या विरोधात असलेल्या विकासाचं खरं मूल्य समजावून सांगण्याचा तो प्रयत्न करीत आहे.इंग्लंडमध्ये पदवी शिक्षण पूर्ण करणाऱ्या आशूतोषने आपल्या गावातच स्थायिक होऊन कोकण भूमीच्या निसर्गाचं जतन, संवर्धन अशा जनजागृतीच्या कार्याला वाहून घेतलं आहे. याआधी चिपळूण ते विशाखापट्टणम अशी एक हजार आठशे किलोमीटरची पदयात्रा ६७ दिवसांत पूर्ण करुन या पदयात्रेतील अनुभवावर आधारित "जर्नी टू द इस्ट’ हे पुस्तक त्याने लिहलं आहे.

> “प्रगतीचं मोजमाप महामार्गांच्या किंवा कारखान्यांच्या संख्येवरून न करता आपल्या नद्यांचं आरोग्य,आपल्या जंगलांचं चैतन्य आणि येथील विविध समाजाच्या लोकांतील काटकपणा यावरुन केलं तर? शाश्वत विकासाचा कच्चा आराखडा कोकण किनारपट्टीकडे आहेच. तिथल्या नैसर्गिक सौंदर्याचं आणि सांस्कृतिक वारशाचं जतन करून आपण निसर्ग-पर्यटनास प्रोत्साहन देऊ शकतो,त्यामुळे पर्यावरणाची अधिक काळजी घेतली जाऊन लोकांना उपजीविकाही मिळेल. निसर्गाचा बळी देऊन माणसाची भरभराट होणार नाही तर निसर्गाशी सुसंवाद साधूनच ती होईल.
> - आशुतोष जोशी”

# साधना स्तब्ध झाली

भारतीय शास्त्रीय संगीत ही कला आहेच, पण त्याहूनही अधिक ती एक साधना आहे. कोणत्याही कलेमध्ये अधिक उंची गाठणं, अधिकाधिक लोकांची पसंती आणि प्रसिध्दी मिळवणं इत्यादी आपोआप घडत जाते. मोठं यश मिळवलेले कलाकार सेलिब्रिटी होतात. पण सच्चे कलावंत या यशात वाहून जात नाहीत. बाहेर हजारोंच्या मैफिलीत त्यांना वाहवा मिळते. त्या संगीतातून एखाद्या सुगंधासारखा कलानंद पसरतो. पण सच्चा कलावंताला त्याच्या मनाच्या आतमध्ये एक दैवी सूर दिसत असतो, जिथपर्यंत पोचायचा त्याचा सतत प्रयत्न असतो. हा सूर कधी भेटतो, कधी हुलकावणी देतो. पण त्या सुराची आराधना नित्य चालू राहते. कुमार, भीमसेन, किशोरीताई, रवीशंकर, बिस्मिल्लाह, विलायतखां, अली अकबर अशांना उदंड प्रसिध्दी, वैभव आणि लोकांचे प्रेम मिळाले. पण हे मिळूनही ते यात असून नसल्यासारखे होते. कारण, त्यांच्या मनात सदैव तो आतला सूर असे. ते प्रत्यक्ष गात व वाजवत नसले तरीही त्याच्यापर्यंत पोचण्याची साधना अखंड चोवीस तास चालू असे. त्यांच्या मैफिली म्हणजे त्या एका दैवी सुराची जाहीर किंवा प्रकट प्रार्थना, आराधना असे. तबलानवाझ झाकिर हुसेन हेही असेच एक साधक होते. यांच्या जाण्यानेअशीच एक महान साधना स्तब्ध झाली. वास्तविक तबला हे तालवाद्य. मैफिलीत साथ करण्यासाठी वाजवले जाणारे वाद्य अशीच त्याची खरी ओळख. त्यातून झाकिर यांनी तबल्यातून अनेक नाद काढून दाखवणे, पाश्चात्य संगीतकारांसोबत वाजवणे असे रुढीला धक्का देणारे असंख्य प्रयोग केले. त्यांचा बाह्य वावरही भीमसेन किंवा किशोरीताईंच्या धीरगंभीर व्यक्तिमत्वाहून कितीतरी भिन्न होता. अतिशय खेळकर, स्टायलिश इंग्रजी वा हिंदी बोलणारे, झुलपे उडवीत वेगवान तालांच्या लडी सादर करणारे असे देखणे झाकिर हे सिनेस्टारसारखे दिसत व वागत. पण तरीही जेव्हा एखाद्या दिग्गज शास्त्रीय गायकाला वा वादकाला साथ करण्यासाठी ते बसत तेव्हा त्यांच्यातला तो साधक पूर्णपणे प्रकट होत असे.

### घरातूनच वारसा

शास्त्रीय संगीतामध्ये पूर्वापार सर्वाधिक महत्व व प्रसिध्दी गायकांना मिळाली. वादक हे गायकांचे साथीदार इतकीच त्यांची ओळख होती. त्यामुळे अकबराच्या दरबारातील तानसेन आपल्याला ठाऊक आहे. पण एखादा बासरीवादक वा सतारिया असा नावाजला गेलेला नाही. साक्षात श्रीकृष्णांनी बासरी वाजवलेली असूनही पन्नालाल घोषांच्या आगमनापर्यंत बासरी ही विरंगुळ्यासाठी वाजवायचे वाद्य होते. विसाव्या शतकात ही स्थिती बदलली. एकेका वादकांनी एकेका वाद्याला प्रचंड प्रतिष्ठा व श्रोते प्राप्त करून दिले. बासरी, शहनाई, सतार, सरोद, संतूर, सारंगी यांच्या वादनाच्या मैफिली होऊ लागल्या व यामध्ये साधना करणाऱ्या दिग्गजांनी वादनाला एका अशक्य कोटीपर्यंत नेऊन ठेवले. गळ्यातून निघणाऱ्या स्वरांचे प्रतिबिंब या वाद्यांमध्ये दिसू शकत होते. त्यातून गायनाइतकाच किंवा त्याहूनही अधिक असा स्वरांचा अवकाश निर्माण होऊ शकत होता. पण तबला या वाद्याचे तसे नव्हते. हे खरोखरीच निखळ साथवाद्य होते. मध्य वा द्रुत लयीत गाण्याला ठेका किंवा लय प्राप्त करून देणे हेच त्याचे काम होते. स्वतंत्रपणे त्यावर केवळ ताल वाजवणे शक्य होते. पण संगीतातला मध्यवर्ती जो राग त्याचा आविष्कार शक्य नव्हता. तरीही आपल्याकडे थिरकवाँ वगैरेंसारखे नामांकित तबलिये होऊन गेले. त्यांच्या तबल्याचे बोल हे बालगंधर्वांच्या गाण्याइतकेच वैशिष्ट्यपूर्ण होते. झाकिर हुसेन यांचे पिताजी अल्लारखाँ हेदेखील याच मालिकेतील दिग्गज कलाकार होते. भारतातील सर्व प्रमुख गायक व वादकांसोबत अल्लारखांनी देश-परदेशात मैफिली केल्या होत्या. त्यामुळे साहजिकच अगदी जन्मापासूनच झाकिर हे त्या घरात तबला जगले. अल्लारखांनी जन्मल्यानंतर झाकिर यांच्या कानात अल्लाचे नाव किंवा कुराणातील प्रार्थनेचे शब्द नव्हे तर तबल्याचे बोल उच्चारले होते. आपल्या कलेतील भक्तीची व साधनेची अत्युच्च परमावधी होती. जन्माला आल्यावर काही तासांमध्येच या साधनेची दीक्षा त्यांना मिळाली व परवा अखेरचा श्वास घेईपर्यंत ती साधना अविरत चालू राहिली.

### वादन देखणे केले

झाकिर यांच्याकडे वारसा होता, प्रतिभाही होती. पण तरीही खडतर अशी तपश्चर्या त्यांना चुकली नाही. तबल्याच्या रियाझाच्या त्यांच्या एकेक कहाण्या ऐकल्या तरी अंगावर काटा येतो. अल्लारखां हा पहाटे उठवून किंवा रात्री उशिरापर्यंत त्यांच्याकडून रियाझ करून घेत. तबला वाजवताना दोन हातांच्या कोपरांखाली मेणबत्त्या पेटवून ठेवायच्या, म्हणजे हात जरा जरी खाली पडला तरी चटका बसावा, असा रियाझ त्यांनी केला अशी एक आख्यायिका आहे. पण ती खरी वाटावी अशाच कठोरपणे अल्लारखां यांनी झाकिर यांना धडे दिले. लहानपणी क्रिकेट खेळायची आवड होती. पण त्यात एकदा बोटाला लागले. आणि तबलावादकाचे बोट म्हणजे प्राण. अल्लारखांनी क्रिकेटवर बंदी घातली. अगदी लहान वयात बडे गुलाम अली खान यांच्यासारख्या महान संगीतकारांच्या रियाझाला संगत करण्यासाठी पाठवले. बाराव्या वर्षी पहिल्यांदा जाहीर वाजवले. पुढे अल्लारखांनी ज्यांना संगत केली अशा रवीशंकर, अलीअकबर इत्यादींसोबत झाकिर यांनी तबला वाजवला. पण कलाकारांमध्ये नवा-जुना, दिग्गज, अप्रसिध्द असा फरक कधी केला नाही. सर्वांसोबत सारख्याच तन्मयतेने साथ केली. झाकिर यांना तबला वाजवताना ऐकणे आणि पाहणे हा एक अनुभव असे. मनाच्या आतला एक दैवी सूर वा ताल ऐकताहेत वा तिकडे जाऊ पाहत आहेत असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर असे. झाकिर यांचे द्रुतगतीतील वादन हा तरुणांच्या अचंब्याचा विषय होता. मैफिलीतील मुख्य कलाकाराला ख्याल गायनातही थोडे थांबून झाकिर यांच्यासाठी अवसर करून द्यावा लागत असे इतकी त्यांची लोकप्रियता होती. बीटल्ससारख्या जागतिक संगीतकारांसोबतचे त्यांचे काम, भारतातील विविध तालवाद्यांच्या कलाकारांसोबतचा त्यांचा सहभाग, ग्रॅमीसारखे पुरस्कार इत्यादींमधून त्यांच्यातील अखंड तरुण उर्जेची द्योतक होती. या उर्जेमुळेच त्यांनी तबलावादन कमालीचे देखणे करून टाकले. विश्वसंगीताशी भारतीय संगीताला जोडण्यात त्यांचे योगदान मोठे होते. पण या सगळ्या मौजमस्तीमध्येही त्यांच्यातला धीरगंभीर साधक हरवला नाही. झाकिर यांना श्रध्दांजली.

श्रद्धांजली

# उत्तम कलावंत, उत्तम माणूस

***जाकिरभाई तबलावादक म्हणून मोठे होतेच खेरीज माणूस म्हणूनही ते तितकेच थोर होते. अनेक दिग्गजांबरोबर साथसंगत केलेली असली तरी आपल्यापेक्षा कमी वयाच्या कलाकाराबरोबर कार्यक्रम करताना ते त्याला कधीही आपले मोठेपण जाणवू द्यायचे नाहीत. त्यांच्याकडून शिकण्याजोगी ही खूप मोठी गोष्ट होती. उत्तम कलाकार आधी उत्तम माणूस असावा लागतो, असे म्हणतात. असा उत्तम माणूस त्यांच्यामध्ये नेहमीच दिसायचा. उस्ताद जाकिर हुसेन यांचे आपल्यातून जाणे ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. कलाकार म्हणून ते मोठे होतेच खेरीज माणूस म्हणूनही ते फार मोठे होते. त्यांच्याशी आलेला वैयक्तिक संपर्क आणि त्यायोगे जुळलेले स्नेहबंध ही माझ्यासाठी नेहमीच मर्मबंधातली ठेव राहील.***



**पं. आनंद भाटे**

खरे पाहता त्यांच्या कलेविषयी कितीही बोलले तरी अपुरेच पडेल. दुसरे म्हणजे, त्याविषयी बोलण्याची आपली योग्यता आहे की नाही, असेही मनात येऊन जाते. जणू अशी माणसे संगीतजगताला काहीतरी देण्यासाठीच जन्म घेत असतात. शतकामध्ये अपवादानेच त्या बघायला मिळतात. जाकिरभाई अशांमधील एक होते. त्यांनी तबलावादनाला फार मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले. काही कलाकार घराण्यांमध्ये अडकतात तर काही त्यापलीकडे जातात. जाकिरभाई अशांमधील असून ते सगळ्या घराण्यांपलीकडे गेले होते. त्यांनी तबलावादनात सगळ्या घराण्यांमधील चांगल्या-चांगल्या गोष्टी घेत आपल्या सादरीकरणाला वेगळेच परिमाण दिले. आपण गाण्याबाबत भीमसेनजींचे नाव घेतो आणि त्यांचे गाणे शास्त्र कळणाऱ्याला तसेच न कळणाऱ्यालाही तेवढेच आवडायचे असे सांगतो. अगदी त्याचप्रमाणे जाकिरभाईंची तबलावादनामधील ख्याती होती. शास्त्र समजणाऱ्यांना त्यांच्या वादनातील ज्ञानाची खोली कळायची आणि तबलावादन आवडणाऱ्यांना, शास्त्र न समजणाऱ्या सामान्य श्रोत्यांनाही त्यांचे वादन तितकेच आवडायचे.

आनंद देऊन जायचे. एकाच वेळी या दोन्ही गोष्टी साध्य करणे हे अत्यंत कठीण काम आहे. शास्त्राधाराला धक्का न लावता एकच वेळी दोन्ही प्रकारच्या श्रोत्यांचे रंजक वाटण्याजोगे वादन सादर करण्यासाठी फार मोठी उंची आवश्यक असून, सिद्धी प्राप्त झालेल्यांशिवाय ती गाठता येत नाही. माझ्या मते, जाकिरभाईंना ही सिद्धी प्राप्त झाली होती. त्यामुळेच कलाकारांमधील दैवी व्यक्तिमत्त्वांमधील ते एक होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

माणूस म्हणूनही ते तितकेच थोर होते. त्यांनी अनेक दिग्गजांबरोबर साथसंगत केलेली असली तरी एखाद्या आपल्यापेक्षा कमी वयाच्या कलाकाराबरोबर कार्यक्रम करताना कधीही आपले मोठेपण जाणवू द्यायचे नाहीत. त्यांच्याकडून शिकण्याजोगी हीदेखील खूप मोठी गोष्ट होती. उत्तम कलाकार आधी उत्तम माणूस असावा लागतो, असे म्हणतात. असा उत्तम माणूस त्यांच्यामध्ये नेहमीच दिसायचा. स्वत: अत्युच्च पदावर विराजमान असूनही इतरांशी वागण्याच्या पद्धतीतून त्यांच्यातील या वैशिष्ट्याची ओळख पटायची. प्रत्येकाशी त्याच्या पातळीवर येत संवाद साधण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती.

अशा या थोर व्यक्तिमत्त्वाबरोबर काम करायला मिळाले, हे मी मोठे भाग्य समजतो. लहानपणीदेखील मला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली आणि आताही तसे अनेक योग आले. लहानपणी मी बालगंधर्वांची गाणी गायचो. एकदा हिराबाई बडोदेकर यांच्या घरी जाकिरभाई आणि आरखा साहेब आले होते. तेव्हा भेट घडवून आणण्यासाठी माझ्यावर अतिशय जीव असणाऱ्या हिराबाईंनी आवर्जून बोलावून घेतले होते. त्यांच्याकडे कोणीही दिग्गज कलाकार आल्यावर बोलावून त्यांच्यासमोर मला गायला सांगणे, ही त्यांची नेहमीची पद्धत होती. त्याप्रमाणे तेव्हाही मी या दोन मोठ्या कलाकारांसमोर गायल्याची आठवण ताजी आहे. गाणारा लहान मुलगा असूनही त्यांनी माझे स्मरण ठेवले हे विशेष आणि मनाचा मोठेपणा म्हणावा लागेल कारण नंतर एखाद्या कार्यक्रमाच्या निमित्ताने भेट व्हायची तेव्हा ते आवर्जून हिराबाईंकडे ऐकलेल्या माझ्या गाण्याची आठवण करुन द्यायचे. ही खचितच खूप बाब म्हणावी लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये पुन्हा एकदा त्यांच्याबरोबर दोन-तीन मैफलींमध्ये काम करण्याचा योग आला. त्यावेळीही समोरच्या माणसाला आश्वस्त करण्याच्या त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याचा नव्याने अनुभव घेण्याची संधी मिळाली. पं. रविशंकर, पं. भीमसेन जोशी अशा सर्वच दिग्गजांना साथ केलेली असूनही माझ्या पिढीतील गायक-गायिकांबरोबर काम करताना त्यांनी कोणताही अभिनिवेश ठेवला नाही. मुख्य म्हणजे त्यांनी आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी नाट्यसंगीताला साथ केली होती. सतत नवनवीन शोधत राहण्याचा मोठ्या कलाकाराचा स्वभावगुणच यातून दिसून आला. कारण एखादा टप्पा गाठल्यानंतर थोडे थांबावेसे वाटते. मात्र, इतके मोठे स्थान मिळवल्यानंतरही जाकिरभाईंमधील कलाकार कलात्मक आनंदासाठी आतुरलेला होता. नवे काही शिकण्यासाठी इच्छुक होता. आपण एवढे केले म्हणजे सगळे काही मिळवले, ही भावना त्यामध्ये नव्हती. त्यामुळेच इतक्या उच्च स्थानी असतानाही त्यांना नाट्यसंगीताला वाचवण्याची इच्छा होती, जी त्यांनी पूर्ण केली आणि त्यांच्यापेक्षा लहान असणार्या आमच्यासारख्या मंडळींना साथ करण्याचा मोठेपणा दाखवला. अर्थातच ही खूप मोठी गोष्ट आहे. त्यांची कला दैवी होतीच त्याचबरोबर त्यांच्यामध्ये एक सख्खा कलाकार आणि चांगला माणूसही होता. म्हणूनच त्यांच्या जाण्याने झालेली हानी नेमयया कोणत्या शब्दांमध्ये व्यक्त करायची, हेच समजत नाही. खरे सांगायचे तर शब्दच सुचत नाहीत. जाकिरभाईंना विनम्र आदरांजली. **(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

## जाण्याची घाई केली

**सलील कुलकर्णी, प्रख्यात संगीतकार**

आपल्या देशात काही शब्द, काही वाद्य, काही खेळ एकेका नावाशी जोडलेले दिसतात. म्हणूनच 'क्रिकेट खेळणार म्हणजे तू काही गावस्कर होणार का...' यासारखी वायये आपण वरचेवर ऐकतो. संतूरचे नाव घेतले की पं. शिवकुमार शर्मा डोळ्यासमोर येतात. या अर्थाने बघता दोन-तीन पिढ्यांनी, संपूर्ण देशाने तबल्याशी जोडलेले नाव म्हणजे जाकिर हुसेन... जगाच्या नकाशावर तबला हे भारतीय वाद्य न राहता त्याला जागतिक संगीतपटालावर नेण्याचे श्रेयदेखील याच नावाला जाते. त्यांना मिळालेले दोन ग्रॅमी पुरस्कार याची साक्ष देण्यास पुरेसे आहेत. त्यामुळेच आज जगाच्या पटलावर अन्य पाश्चात्य तालवाद्यांप्रमाणेच तबलाही महत्त्वाचे स्थान राखून आहे. जाकिरभाईंच्या वादनामुळे आणि संगीत दिग्दर्शनामुळेच हे शयय झाले आहे. माझ्या मते, त्यांनी केवळ संगीत दिले असते, चित्रपटांसाठी संगीत दिग्दर्शन केले असते तरी ते तेवढेच मोठे झाले असते. कारण ते इतके चांगले संगीतकारही होते.

त्यांनी आपल्या वावरातून एखाद्या कलाकाराने कसे वावरावे हे दाखवून दिले. प्रेक्षकांशी वा अन्य संबंधित लोकांशी संवाद कसा साधावा, आपल्या वडिलांविषयी कसे बोलावे हे कोणी त्यांच्याकडून सहजी शिकू शकते. मला सवाई गंधर्व महोत्सवातील एक प्रसंग अजूनही स्पष्टपणे आठवतो. त्यावेळी निवेदकांनी उस्ताद आरखा साहेब आणि उस्ताद जाकिरभाई असे सांगताच थांबवत जाकिरभाई म्हणाले, 'ऐसा नही होता. वो उस्ताद है, आप मुझे सिर्फ जाकिर हुसेन बिलाओ...' आपल्यावर नकळत अशा वाययांचे संस्कार होत असतात. ते आपल्याही जगण्याला, विचारांना, अभिव्यक्तीला वेगळी कलाटणी देतात. म्हणूनच यात जाकिरभाईंचा खूप मोठा वाटा आहे. आता जाकिरभाई आपल्यात नाही. त्यांच्या पश्चात देशात, जगात चांगले तबलावादक होतीलही. मात्र एखादा ब्रँड तयार करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असेलच असे सांगता येणार नाही. जाकिरभाईंनी तो सहजी तयार केला होता. ही एकरुपता इतयया पराकोटीची होती की, एका चित्रपटातील गाण्यातही तो संदर्भ आपण ऐकलेला आहे. त्यामुळेच तबलावादक अनेक असले तरी त्यांचेच नाव समोर येते आणि यापुढेही तेच नाव समोर येत राहील. असा समानार्थी शब्द होणे, हीच बाब अत्यंत दुर्मीळ पण तितकीच अनोखी आहे. जाकिरभाईंनी ती साधली.

आता जाकिरभाई आपल्यात नसले तरी त्यांचे विचार कधीच संपू शकणार नाहीत कारण अशी मोठी माणसे विचाररुपाने नेहमीच आपल्याबरोबर राहत असतात. सुदैवाने आता आपल्याकडे त्यांच्या असंख्य क्लिप्स उपलब्ध आहेत. त्यांच्या वादनाचे अनेक नमुने आपण हवे तेव्हा बघू शकतो. त्यांच्या मुलाखती ऐकू शकतो. त्यामुळेच या माध्यमातून आपण त्यांच्या संपर्कात राहूच. पण मुळात काही लोकांनी निरोप घेणेच आपल्याला मंजूर नसते. जाकिरभाई हे असेच एक नाव आहे. त्यातूनही सध्याचा काळ बघता ७३ हे काही जाण्याचे वय राहिलेले नाही. आता लोक ८५-९० पर्यंतचे वय सहज पार करतात. तेव्हा जाकिरभाईंनी अंमळ घाईच केली असे म्हणावे लागेल. त्यांनी आणखी काही वर्षे तरी आपल्यात राहायला हवे होते. विनम्र आदरांजली.

आजकाल

# भाजप 'आप'ला दिल्ली 'जिंकू देईल'

ईव्हीएम वरुन राज्यात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ईव्हीएमच्या माध्यमातून निवडणूक नको. म्हणून ग्रामपंचायती ठराव मंजूर करत आहेत. तर भाजपही यात मागे नसून मतदान ईव्हीएम वरतीच व्हावे म्हणून सोलापूर जिल्ह्यातील एका ग्रामपंचायतीने ठराव मंजूर केला आहे.

हिंदुत्व, राम मंदिर, ओबीसींना गोंजारणे, हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरण, मराठा विरुध्द ओबीसी ध्रुवीकरण, इतिहासातील मढी उकरुन इतिहासाचे विकृतीकरण असे मुद्दे मतदानावर परिणामकारक ठरत नाहीत!

त्यामुळे निवडणूकीच्या आधी डीबीटीच्या माध्यमातून सरकारी पैसा ठराविक वर्गाला अल्प प्रमाणात द्यायचा. त्याचप्रमाणे प्रशासनास हाती घेऊन काळा पैसा अल्प प्रमाणात ठराविक मतदारांच्या हाती थेट द्यायचा.

धाब्यावर रमणा सुरु ठेवायचा. दुबार मतदार वाढवायचे. बोगस मतदान करायचे. गोदी मेडीया आणि पेड सोशल मेडीया या माध्यमातून वातावरण निर्मिती करुन ईव्हीएम सेटींगच्या माध्यमातून धक्कादायक निकाल लावून निवडणूका जिंकायच्या. हा नवा व दिर्घकाळ परिणामकारक ठरेल असा फॉर्म्युला महाशक्तीच्या हाती आला आहे.याला छेद देणे कसे व कधी शक्य होईल? हे आत्ता तरी सांगणे कठीण!

**तुषार गायकवाड**

मात्र हा असंतोष शमवण्यासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्लीची निवडणूक भाजपा एकहाती जिंकणार नाही. सद्यस्थितीत माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पार्टी हा पक्ष गेल्या ३ वर्षांतील भ्रष्टाचाराचे आरोप, तुरुंगवास आणि भाजपच्या कुरघोडीच्या राजकारणात भरडून निघाला आहे.

आप आणि काँग्रेस विधानसभा निवडणूक एकत्र लढत नाही. हे आपच्या दृष्टीने चांगले आहे. कारण राळेगणसिध्दीच्या एकसदस्यीय सायंशाखेला घेऊन केजरीवालांनी आजच्या भाजप प्रमाणेच काँग्रेस पक्षाची बदनामी केली होती. काँग्रेसच्या पाठिंब्यामुळेच त्यांना पहिल्यांदा मुख्यमंत्री होता आले.



सत्ता मिळाल्यावरही पूर्ण बहुमत नसल्याने केजरीवाल समाधानी नव्हते. केजरीवालांनी आपल्या हुशारीच्या जोरावर काँग्रेस सोबतची आघाडी तोडून दुसऱ्यांदा निवडणूक लढवून पूर्ण बहुमताची सत्ता आणली. आणि जनतेचा पैसा जनतेला म्हणत सरकारी योजनांचे रमणे सुरु केले.

भाजपला माफक विरोध करत काँग्रेस नामोहरम करुन संपवायची हेच धोरण ७-८ वर्षे केजरीवालांनी वापरले. मात्र जेव्हा भाजपा आप संपवायला उठली तेव्हा मात्र केजरीवालांनी भूमिका बदलली आणि काँग्रेस सोबत हातमिळवणी केली. आताच्या निवडणूकीत तोच फटका बसू नये म्हणून केजरीवाल स्वतंत्र लढत आहेत.

मात्र आप, काँग्रेस यांची गाठ संपूर्ण सरकारी यंत्रणेसह भाजपसोबत आहे. तर भाजपापुढे ईव्हीएम असंतोषाचे मोठे कारण आहे. त्यामुळे या निवडणूकीत केजरीवाल त्यांचे विरोधात वातावरण असूनही फार थोड्या मतांच्या फरकाने निवडून येतील. २०१५ च्या निवडणूकीत ७० पैकी ६७ आमदार निवडून आणले होते. तर गत निवडणूकीत त्यांना ७० पैकी ६३ आमदार निवडून आणता आले होते.

या निवडणूकीत एवढा मोठा आकडा गाठता येणार नाही. मात्र काठावरच्या बहुमताच्या आसपास पोहोचतील. भाजपाला दिल्ली जिंकायचीच असेल तर काठावरचे बहुमत मिळेल एवढ्या जागा निवडून आणतील. आपचे काही आमदार फोडून सत्ता मिळवतील. पण हरियाणा आणि महाराष्ट्राप्रमाणे ईव्हीएम निकाल येणार नाहीत.

ईव्हीएम असंतोष शमविण्यासाठी हाच रामबाण उपाय भाजपासमोर आहे. केजरीवाल काठावरचे बहुमत किंवा सत्तासुंदरीपर्यंत गेलेच तर त्यामागे दिल्लीतील ७६ टक्के कुटुंबांना मोफत पिण्याचे पाणी पुरवणे, ६५ टक्के कुटुंबांना मोहल्ला क्लिनीक व रुग्णालयात मोफत उपचार, ५८ टक्के महिलांना मिळालेला मोफत बसप्रवास आणि ४४ टक्के कुटुंबांना मिळालेला मोफत शिक्षणाचा फायदा अशी कारणे असतील.

त्याचसोबत दिल्लीतही महिला सन्मान योजना सुरु करण्यात आली असून या अंतर्गत महिलांना प्रतिमाह १,००० रुपये देण्यात येणार आहेत. तर निवडणूक जिंकल्यावर बिनखात्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांना २,१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. तसेच आश्वासन केजरीवाल यांनीही दिले आहे.

सरकारी खर्चाने रमणे, काळ्या पैशाचा बेसुमार वापर आणि ईव्हीएम हेच यापुढील निवडणूका जिंकण्याचे तंत्र असणार आहे. याच आधारे भाजपा दिल्ली जिंकू शकते. पण ती आकडेवारी हरियाणा आणि महाराष्ट्राप्रमाणे नसेल. ईव्हीएम विरोधातील मूड बदलण्यासाठी काठावरचे खेळ महाशक्ती करेल असा अंदाज आहे. बघू फेब्रुवारी २०२५ मध्ये काय होते?

**साभार**

लोकसंसद

### महिलांमध्ये कर्ज बुडविण्याचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी

करदात्यांना कर्जाच्या परतफेड बाबत पुरुषांपेक्षा महिला अधिक विश्वसनीय वाटत असल्याचे आढळून आले आहे महिलांच्या या गुणामुळे कर्जदाते भविष्यात महिलांना अधिक कर्ज देतील असे दिसते ही बातमी नुकतीच वाचली. गेल्या आर्थिक वर्षात कर्जाची परतफेड न करणाऱ्या महिलांचे प्रमाण २.६ टक्क्यावरून २.१ टक्क्यावर आल्याचे आढळले आहे. कर्ज घेणाऱ्या महिलांची संख्या सुद्धा २०२३ मध्ये पुरुषापेक्षा तुलनेत वाढली होती. मोठ्या रकमेचे कर्ज घेण्याचे प्रमाणही महिलांमध्ये वाढले आहे. दक्षिण कोरिया व अमेरिका देशात गेल्या सुमारे तीन चार दशकात अनेक आर्थिक घडामोडी झाल्या व संपत्तीची सूत्रे पुरुषाकडून महिलांकडे गेली. आर्थिक घडामोडीमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. सरकारचे धोरण सुद्धा याला सहाय्यभूत होत आहे. प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री जन धन योजना, प्रधान मंत्री मुद्रा योजनाआदी योजनांतून सरकारचे प्रोत्साहन मिळत असल्याने साहजिकच आर्थिक घडामोडीमध्ये महिलांचा वाटा वाढत चालला आहे असे दिसते. एकूणच कर्ज घेणे व त्याची परतफेड वेळेवर व व्यवस्थित करणे या बाबी महिला पुरुषापेक्षा व्यवस्थित करतात व कर्ज फेडीमध्ये सुद्धा त्या हप्ते वेळेवर भरतात असे दिसून आले आहे. म्हणूनच येत्या काही वर्षात सर्वच आर्थिक व्यवहारात पुरुषांपेक्षा महिला अधिक विश्वासार्ह वाटतील यात शंका नाही.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१७ डिसेंबर**

**१८६९ :-** भाषांतरकार डेव्हिड के पन यांचे निधन. गँड डफच्या 'हिस्ट्री ऑफ द मराठाज' या इंग्रजी ग्रंथाचे 'बखर मराठ्यांची' या नावाने मराठीत भाषांतर त्यांनी केले. या कामी त्यांना बाबा साने यांनी मदत केली. **१८७४ :-** कवी, निबंधकार भास्कर दामोदर पाळंदे यांचे वयाच्या ४२ वर्षी निधन. त्यांनी रचलेल्या 'रत्नमाला' मधील गीते प्रार्थना समाजात म्हटली जात. गीतेवरील त्यांची साकीबद्ध समश्लोकी रचना 'गीतासुधा' या नावाने प्रसिध्द विक्रमोर्वशीय' चे गद्यपद्यात्मक भाषांतर त्यांनी केले. याशिवाय काही निबंध त्यांच्या नावावर आहेत. **१९०१ :-** कथा-कादंबरीकार यशवंत गोपाळ जोशी यांचे निधन. त्यांच्या कथांचे 'पुर्नभेट', 'तुळशीपत्रे आणि इतर लघुकथा', 'रेघोट्यांचे दैवत', 'मायेच्या सावल्या', 'तरंग' आदी संग्रह निघाले, तसेच 'पडसाद', 'होमकुड' या कादंबऱ्या. 'दुधाची साय' हे पुस्तकही आत्मपर पुस्तकांत उल्लेखनीय ठरले. 'वहिनीच्या बांगड्या' आणि 'शेवग्याच्या शेंगा' हे गाजलेले चित्रपट त्यांच्या कथांवरुन निघाले. **१९११ :-** चित्रकार, लेखक डी. डी. रेगे यांचा जन्म. 'पुणे व प्राचीन धार्मिक स्थाने', 'कलावंताची शब्दचित्रे', 'क्रिकेटवीरांच्या तीन पिढ्या', 'संत प्रसाद' या पुस्तकांसह सद्गुरु नारायण महाराज आणि सद्गुरु जंगली महाराज यांची चरित्रे व चित्रे', 'चित्र नियतीची' हे आत्मचरित्र अशी साहित्य संपदा आहे. **१९१४ :-** कवी, कादंबरीकार दत्तात्रय विष्णू तेंडुलकर तथा प्रफुल्लदत्त यांचा जन्म. विविध विषयांवर २७ पुस्तके प्रसिध्द. त्यामध्ये 'अशोकाची फुले', रेशमी लडया' हा गद्यकाव्याची तर 'अनंताच्या आराधनेत' हा रविंद्रनाथ टागोरांच्या ग्रंथाचा अनुवाद ही उल्लेखनिय पुस्तके. **१९१६ :-** नाट्यसाहित्याचे अभ्यासक, समीक्षक विष्णू दत्तात्रय साठे यांचा जन्म. 'मराठी नाटयकथा', 'नाट्यप्रवेश भाग १ ते ५' या पुस्तकांशिवाय त्यांच्या अकाली निधनामुळे 'मराठी नाटयरचना तंत्र आणि विकास' हा त्यांचा अपूर्ण प्रबंध पुस्तक रुपात प्रकाशित झाला. **१९२० :** कथाकथन, नाटयवाचन करणाऱ्या लेखिका इंदिरा गोविंद कुलकर्णी यांचा जन्म. 'आषाढगंध' हा भावगीत संग्रह, 'जीवनवेल' ही स्त्रीगीते, 'जेव्हा घराचा बगीचा होतो' ही नाटिका, 'मानाची पालखी' हे बालनाटय, ''हळवे ऊन' ही कथा आणि 'पळतापळता सुटली चड्डी', 'वाघोबा वाघोबा येतोस का?' हे काव्य अशी साहित्य संपदा. तसेच यांची गीते अनेक नामवंत गायकांनी गायली आहेत. **१९२४:-**विचारवंत, समीक्षक सखाराम हरी देशपांडे यांचा जन्म. कृषी- अर्थशास्त्र या विषयाचे तज्ञ अशी ख्याती असणाऱ्या देशपांडे यांचा भारतीय शेती हा महत्त्वाचा ग्रंथ. त्यानंतर दलित मुक्तीची नवी दिशा, संघातले दिवस आणि इतर लेख, सावरकर ते भा.ज.प.- हिंदुत्व विचारांचा चिकित्सक आलेख, काही आर्थिक काही सामाजिक हे वैचारिक लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध. याखेरीज काही अनुवादित आणि संपादित साहित्य त्यांच्या ग्रंथरूपाने प्रसिद्ध. १९२९ लेखक, ग्रंथकार डॉ. माणिकराव पद्यण्णा मंगुडकर यांचा जन्म. 'महर्षी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण, शाहू महाराज यांच्या चरित्रासह 'बदलत्या महाराष्ट्राचे स्वरुप', 'उदयाच्या महाराष्ट्राची वाटचाल', 'व्यक्ति स्वातंत्र्याचा विकास' आदी ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९४२ :** कवी श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर यांचे निधन. 'सुवर्णचंपक', 'एकावली' हे काव्यसंग्रह आणि 'गुणसुंदरी' ही अनुवादित कादंबरी प्रसिध्द. **१९४२:** नट आणि नाटककार विष्णू हरी औंधकर यांचे निधन. 'बेबंदशाही', 'आग्र्याहून सुटका' ह्या ऐतिहासिक नाटकांसह 'महारथी कर्ण' हे पौरोणिक नाटकही त्यांनी लिहिले. **१९४४ :** वैदिक साहित्य आणि आधुनिक मराठी वाङ्मयाचे समीक्षक वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१७ डिसेंबर

१) श्रीम. नलिनी मोहनलाल पारेख
पारेखवाडी,बाजारपेठ, अलिबाग
१७-१२-१९४९


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# महायुतीचे अत्याचारी, खुनी सरकार

## विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांची टीका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून ईव्हीएमच्या जोरावर सत्तेवर आलेले महायुतीचे सरकार खुनी, अत्याचारी आणि शेतकरीविरोधी आहे, असा आरोप करत महाविकास आघाडीने हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने आयोजित केलेल्या चहापानावर बहिष्कार घातला आहे.

नागपूरच्या रविभवन येथे रविवारी (दि.१५) दुपारी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निवासस्थानी मविआची बैठक झाली. या बैठकीला दानवे यांच्यासह शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू, आ. महेश सावंत, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आ. विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते जितेंद्र आव्हाड, ज.मो. अभ्यंकर आदी उपस्थित होते. सरकारने आयोजित केलेल्या चहापानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. मविआच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली आहे.

महायुतीचे सरकार शेतकरीविरोधी, दलितांवर अत्याचार करणारे आणि दिवसाढवळ्या खून करणारे सरकार असल्याचा गंभीर आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी यावेळी केला आहे. सोयाबीन, कापसाला भाव न देणारे, दुधाचे भाव घसरवणारे आणि शेतकऱ्यांची दयनीय अवस्था करणारे हे सरकार आहे, असा जोरदार हल्ला त्यांनी केला. तसेच, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महायुती सरकारवर टीका करत म्हणाले की, सोयाबीन खरेदी केंद्र अजून सुरू झालेले नाही, शेतकरी कर्जमाफीची भूमिका सरकारने स्पष्ट करावी. बीडचे सरपंच संतोष देशमुख यांची क्रूर हत्येप्रकरणीही त्यांनी सरकारवर टीका केली आहे. देशमुख यांची हत्या करून त्यांचे प्रेत नासवण्याचे काम हल्लेखोरांनी केले, मात्र अद्याप त्यांच्यावर सरकारने कठोर कारवाई केलेली नाही, असा आरोप नाना पटोले महायुती सरकारवर केला आहे.

### जनतेचे प्रश्न ताकदीने मांडणा

**विरोधी पक्षाच्या आमदारांची संख्या कमी असली म्हणून काय झाले, महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न आणि समस्या दोन्ही सभागृहांत ताकदीने आणि प्रभावीपणे मांडू, अशी ग्वाही यावेळी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिली आहे.**



### बेरोजगारांना विवस्त्र फिरण्याची वेळ

**महाराष्ट्राची अधोगती झाली आहे, महाराष्ट्र कर्जबाजारी झाला आहे, शेतकरी रोज आत्महत्या करत आहे, उद्योगधंदे बाहेर पळाल्याने महाराष्ट्रातील बेरोजगारांवर रस्त्यावर विवस्त्र फिरण्याची वेळ आली आहे. राज्यात गुंतवणूक येत नाही. गुंतवणूकदारांमध्ये महाराष्ट्राबाबत अनास्थ निर्माण झाली आहे. असे असताना दुसरीकडे पाठ थोपटण्याचे महायुती सरकारचे काम सुरू झाले आहे, अशी टीका काँग्रेस आ. विजय वडेट्टीवार यांनी केली.**

## शिंदे गटात राजीनामा सत्र सुरू

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मंत्रिमंडळ विस्तारात शिंदे गटातील अनेकांना संधी मिळालेली नाही. तसेच, अनेकांचा पत्ता कट झाला आहे. त्यामुळे शिंदे गटात राजीनामा सत्र सुरू झाले आहे. यावेळी, आ. नरेंद्र भोंडेकर यांनी मंत्रिपद न मिळाल्याने शिंदे गटाच्या उपनेते व विदर्भ समन्वयकपदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. इतर अनेक आमदारही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून टोकाचा निर्णय घेण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती समोर येत आहे.

शिंदे गटातील काही आमदार मंत्रिमंडळ विस्तारात अक्षरशः गुडघ्याला बाशिंग बांधून होते, मात्र त्यांना संधी मिळाली नाही. अडीच वर्षांनंतर संधी देऊ असे सांगूनही त्यांचा पहिल्या टर्मसाठी आग्रह होता. त्यात भोंडेकर यांचा समावेश होता, मात्र मंत्रिपद न मिळाल्याने त्यांनी शिंदे गटाच्या पदांचा राजीनामा दिला आहे. भोंडेकर यांनी शिंदे गटाच्या बाजूने यापुढे कोणतीही भूमिका मांडणार नाही, असा पवित्रा घेतला आहे. मात्र, आमदारकीचा राजीनामा त्यांनी दिलेला नाही.

तसेच, माजी मंत्री दीपक केसरकर, अब्दुल सत्तार, तानाजी सावंत यांनाही नव्या मंत्रिमंडळात पुन्हा स्थान न मिळाल्याने त्यांनीही शपथविधीकडे पाठ फिरवत नाराजी व्यक्त केली आहे. मागाठाणेचे शिंदे गटाचे आ. प्रकाश सुर्वे यांनीही मंत्रिपद न मिळाल्याने माध्यमांसमोर उघड नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, राजीनाम्याबाबत ब्रसुद्धा काढला नाही. भाजपची बाजू प्रभावीपणे मांडल्यासारखे दाखवायचे किंवा भाजप विरोधकांवर शिंतोडे उडवायचे म्हणजे आपल्या पदरात मंत्रिपद पडेल अशा आशेवर राहिलेल्या वाचाळवीरांनाही मंत्रिमंडळ विस्तारात स्थान मिळाले नाही.

# आता मंत्रीपद दिले तरी नकोच

## आ. शिवतारेंचा फडणवीस सरकारवर संताप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर सत्तापक्षांमध्ये नाराजी दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस नेते छगन भुजबळ यांनी त्यांची नाराजी बोलून दाखवल्यानंतर आता शिवसेनेचे आमदार विजय शिवतारे यांनी वाईट वागणूक मिळाल्याचे म्हटले आहे. शिवाय आपल्याला अडीच वर्षे मंत्रिपद दिले तरी नको, असे देखील ते म्हणाले आहेत.



देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार नागपूरमध्ये रविवारी (दि.१५) झाला. यावेळी ३३ कॅबिनेट मंत्री आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. यामध्ये भाजपचे १९, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादीच्या ९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. त्यानंतर सत्तापक्षाचे आमदार नाराज असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, माध्यमांशी बोलताना विजय शिवतारे म्हणाले की, मंत्रिपदाच्या यादीमध्ये माझे नाव शेवटपर्यंत होते, परंतु, ऐनवेळी नाव बाद केल्यामुळे नाराजी नक्कीच आहे. यापूर्वी महाराष्ट्रात कर्तृत्वावर जबाबदारी मिळायची. परंतु, आता आपण बिहारच्या दिशेने जात आहोत, असे दिसत आहे. कारण राज्यात बिहार प्रमाणे जातीयवादीपणा सुरु आहे. आता मला अडीच वर्षे मंत्रिपद दिले तरी मी घेणार नाही. लोकांना विश्वासात घेऊन काम व्हायला हवे होते, असा संताप शिवतारे यांनी व्यक्त केला आहे.

# गद्दार गँगचा मंत्रिपदासाठी हावरटपणा

## आदित्य ठाकरेंची खोचक प्रतिक्रीया

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुतीला ईव्हीएमने, निवडणूक आयोगाने बहुमत दिल्यानंतरही मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीला दोन आठवडे लागले होते. त्यानंतर मंत्रिपदासाठी गद्दार गँगमध्ये तुला काय मिळणार, मला काय मिळणार, कोणते मंत्रिपद मिळणार, खायला काय मिळणार, अशी भांडणे सुरू आहेत. हा स्वार्थीपणा, हावरटपणा लोकांसमोर आला आहे. हे विचार महाराष्ट्रासाठी भयानक आहेत, अशी प्रतिक्रिया शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आ. आदित्य ठाकरे यांनी मंत्रिमंडळ



विस्तारावर दिली आहे.


आदित्य ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मंत्रिपदासाठी महायुतीमध्ये सुरू असलेल्या भांडणावर टीका केली आहे. बहुमत मिळूनही खात्यांसाठी वाद सुरू आहेत, हे फार चुकीचे आहे. महाराष्ट्राचे चित्र इतके भयानक कधीही नव्हते आणि नसावे अशीच आपली ईश्वरचरणी प्रार्थना आहे, असा टोला देखील आदित्य ठाकरे यांनी लगावला आहे. मंत्रिपदासाठी कुणी जॅकेट शिवून तयार असते तर कुणी प्रार्थना करत असते. हे सगळे ठीक आहे, पण बहुमत मिळाल्यानंतर स्वार्थीपणा बाजूला ठेवून तातडीने लोकसेवा सुरू करायला हवी होती, असे म्हणत त्यांनी शिंदे गटाच्या भरत गोगावले यांच्यावरही निशाणा साधला आहे.

तसेच, शिंदे सरकारने रस्ते घोटाळ्यांमध्ये १२ हजार कोटींचा मलिदा लाटला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी या रस्ते घोटाळ्यांची अधिकृत चौकशी करावी, अशी विनंतीही आदित्य ठाकरे यांनी यावेळी केली आहे. फडणवीस सरकारची रस्ते घोटाळ्यावर खरोखरच कारवाई करण्याची इच्छा असेल तर त्यांना तत्कालीन घटनाबाह्य मुख्यमंत्री शिंदे व त्यांच्या कार्यकाळातील मंगलप्रभात लोढा आणि दीपक केसरकर या दोन पालकमंत्र्यांना मंत्रिमंडळाबाहेर ठेवावे लागेल, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

# घोटाळा लपवण्यासाठी अधिकाऱ्यांचा खटाटोप

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाविषयी नवनवीन घोटाळे बाहेर येत आहेत. संध्याकाळी ६ नंतर अचानक वाढेलेला मतदानाचा टक्का सर्वांना अचंबित करून टाकणारा असून निवडणूकीचा हा घोटाळा लपवण्यासाठी १७ 'अ' फॉर्म ४५ दिवसांनी दिला जात असल्याचा आरोप आ. जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.



कोणत्याही निवडणूक प्रक्रियेत १७ 'अ' हा फॉर्म अतिशय महत्वाचा आहे. या फॉर्ममध्ये निवडणूक अधिकाऱ्यांकडून दर दोन तासाला झालेले मतदान आणि इतर सर्वच तांत्रिक माहिती भरून त्याची नोंदणी नोंदवहीत करण्यात येत असते. तसेच, १७ 'क'वरून मतदानाची आणि मतदारांची माहिती दोन टप्प्यांत नोंद केली जाते. असे असतानाही सायंकाळी ६ नंतर झालेली मतांची बेसुमार वाढ अशक्य आहे. शिवाय, झालेले मतदान आणि मतमोजणीतील मतदान यामध्ये तफावत आहे.

त्यामुळे हा घोटाळा उघडकीस आणण्यासाठी १७ 'अ' आणि १७ 'क' ही दोन कागदपत्रे अतिशय महत्वपूर्ण आहेत. मात्र, निवडणूक अधिकारी हीच कागदपत्रे ४५ दिवसांनी म्हणजेच कोर्टात दाद मागण्याची मुदत संपल्यानंतर देणार असल्याचे आव्हाड यांनी सांगितले आहे. एकूणच घोटाळा लपवण्यासाठी १७ 'अ' दिला जात नाही ना? अशी शंका उपस्थित करून राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे विधिमंडळ गटनेते आ. जितेंद्र आव्हाड यांनी सर्व तांत्रिक बाजू उघडकीस आणल्या आहेत.

## दोन मतदारसंघात ईव्हीएम पडताळणी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत इलेक्ट्रीक व्होटींग मशिन कामकाजावर दोन मतदारसंघातील उमेदवारांनी आक्षेप नोंदवले आहेत. त्यासाठी उत्पादक कंपनीतून दिवस निश्चित केले जातील, अशी माहिती निवडणूक उपजिल्हाधिकारी राहुल गायकवाड यांनी दिली आहे. ते म्हणाले की, या निवडणूकीत राजापूर आणि चिपळूण येथील उमेदवारांनी ईव्हीएमच्या कार्यपद्धतीबाबत आक्षेप नोंदवले आहेत. या यंत्रांची पडताळणी आयोगाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.

# सुप्रिया सुळेंचे सरकारवर टिकास्त्र

**। पुणे । प्रतिनिधी ।**

परभणी बंद दरम्यान हिंसाचार झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर पोलिसांनी अनेकांना अटक केली होती. दरम्यान, त्यातील सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला आहे. हा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या घटनेनंतर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही



यावरून राज्य सरकारवर टिकास्त्र सोडले आहे.

बीड आणि परभणीत ज्या घटना घडल्या आहेत, त्याचा खा. सुप्रिया सुळे यांनी जाहीर निषेध केला आहे. नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांनी याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. यावर चर्चा होऊन महाराष्ट्राला उत्तरं मिळाली पाहिजे, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाल्या की, एखाद्या व्यक्तीचा तुरुंगात मृत्यू होणे दुर्दैवी आहे. याची चौकशी व्हायलाच पाहीजे. या आठवड्यात दोन-तीन मोठ्या घटना घडल्या आहेत. राज्यात निवडणुकीचा निकाल लागून दोन ते तीन आठवडे झाले आहेत, परंतु राज्याला गृहमंत्रीच नाही. राज्यातील जनतेने इतके मोठे बहुमत दिले आहे, त्यामुळे सरकारने आतापर्यंत कामाला लागायला पाहिजे होते. परंतु, दुर्दैवाने तसे झाले नसल्याचे त्या म्हणाल्या.

# उपमुख्यमंत्र्यांच्या ड्रीम प्रकल्पाला विरोध

## क्लस्टर योजेनेसाठी रहिवासी इमारतीवर हातोडा

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ड्रीम प्रकल्प असलेल्या क्लस्टर योजनेला ठाणे पूर्व भागातील कोपरी येथील दौलत नगरमधील रहिवाशांचा विरोध कायम असताना शुक्रवारी (दि.१३) ठाणे महापालिकेने अखेर येथील एका इमारतीवर हातोडा टाकून ही इमारत तोडली आहे.



या इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव असताना विकासकाने कोणत्याही प्रकारचा करारनामा रहिवाशांसोबत केलेला नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. याशिवाय राहण्याची पर्यायी व्यवस्था न करता पालिकेने इमारत तोडताना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता कारवाई केली. त्यामुळे क्लस्टर योजनेसाठीच इमारती धोकादायक ठरवल्या जात असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

येथील काही इमारती या धोकादायक आणि मोडकळीस आल्यामुळे येथील रहिवाशांनी इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प हाती घेतला. त्यानुसार २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत इमारतींच्या पुनर्विकासाचे भूमिपूजनाचा सोहळा पार पडला. मात्र, कालांतराने विकासक आणि कमिटीने कोणालाही विचारात न घेता क्लस्टर योजनेचा घाट घालण्यात आला असल्याचा आरोप येथील रहिवाशांनी केला आहे.

# शेतकऱ्यांचे सौरपंपाचे प्रस्ताव प्रलंबित

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील दोन हजार शेतकऱ्यांचे पीएम कुसूम सौरपंप योजनेचे अर्ज अद्यापही प्रलंबित आहेत. ही चांगली योजना शेतकऱ्यांसाठी उभी राहत असल्याचे सरकारने जाहीर केले; परंतु, प्रत्यक्षात मात्र तिची अंमलबजावणी कासवगतीने सुरू आहे. यामुळे कोकणात शेतीचा प्रश्न गंभीर बनला आहे.



सरकारी यंत्रणांचा ढिसाळ कारभार आणि उदासीनतेचा शेतकऱ्यांना फटका बसत आहे. शासन दरवर्षी नवीन घोषणा आणि मोठमोठ्या भाषणांतून शेतकऱ्यांचे भले करण्याचे वचन देते. याच योजनांवर अंमलबजावणीच्या नावाखाली वर्षानुवर्षे कागदोपत्री खेळ सुरू असतो. तालुक्यातील शेतकरी आजही या सौर पंपाच्या प्रतीक्षेत आहेत. २ हजार अर्ज प्रलंबित आहेत, म्हणजे या शेतकरी कुटुंबांचे स्वप्न अजूनही साकार व्हायचे आहे.

शेतकऱ्यांच्या या समस्यांकडे स्थानिक प्रशासन आणि राज्य सरकारने दुर्लक्ष केले आहे. नवीन योजनांचे उद्घाटन करण्यापूर्वी जुन्या योजनांच्या अंमलबजावणीकडे लक्ष द्यायची गरज आहे. यामुळे, कोकणातील शेती वाचवायची असेल, तर या शेतकऱ्यांना तातडीने सौरपंप योजना मिळून देणे गरजेचे आहे.

## प्लास्टिक पिशव्या विक्रेत्यांवर कारवाई

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

कणकवली नगरपंचायतीतर्फे गेल्या तीन दिवसांपासून एकल वापर प्लास्टिकचा वापर करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई सत्र राबविण्यात येत आहे. यामध्ये ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या, वस्तू वापरणाऱ्या ४५ विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून २० हजार ३०० रुपये दंड वसुली करण्यात आली. एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दर महिन्याला मोहीम राबिवण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत.

## रत्नागिरीत फळे खरेदीकडे ग्राहकांचा कल

# देशी-विदेशी फळांची रेलचेल

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

हिवाळ्यातील आल्हाददायक वातावरणात आरोग्याची भर टाकण्यासाठी बाजारात देशी-विदेशी फळांची रेलचेल झाली आहे. त्यांचे दरही आवाक्यात असून चिपळूणतील नागरिक फळांवर ताव मारताना दिसत आहेत.

चिपळूण शहर, खेर्डी, सावर्डे, आरवली बाजारपेठेत रस्त्यालगत फळ विक्री होत आहे. संत्री, मोसंबी, पेरू, सीताफळ, द्राक्षे, सफरचंद, पपई, कलिंगड, अननस यांसारख्या देशी फळांची आवक वाढली आहे. मार्गशीर्ष या



उपवासाच्या महिन्यामुळेही भाज्या व फळांची रेलचेल आहे. उपवास आणि पुजेसाठी फळांना विशेष मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले आहे. शहरातील भाजी मंडई परिसरात दररोज पहाटे कित्येक टन फळाची आवक होते. त्यानंतर ती किरकोळ विक्रीसाठी पाठवली जात आहेत. यावेळी, कॅलिफोर्नियातून आलेली लाल-काळी द्राक्षेही भाव खात आहेत. ही गोल, गरगरीत द्राक्षे चवीला फार गोड नसली, तरी टेबलफ्रुट म्हणून डायनिंग टेबलवर जागा मिळवत आहेत. तसेच, 'क' जीवनसत्त्व असणारे व आयुर्वेदिक औषधांमध्ये वापरले जाणारे ॲवाकेडोदेखील भाव खाऊन आहेत. १०० रुपयांना नग यानुसार त्यांची विक्री सुरू आहे.

### फळांचे किरकोळ दर

**भारतीय सफरचंद १२० ते १४० रु., इराणी सफरचंद १८० ते २०० रु., आयात सफरचंद २५० ते २६० रु., मोसंबी १०० रु., नागपूर संत्री ६० ते ७० रु., सीताफळ ८० ते १०० रु., पेरू ६० ते ८० रु., ॲप्पल बोरे ४० ते ७० रु., ड्रॅगन फ्रुट ७० ते ८० रु., डाळिंब १८० ते २०० रु. (सर्व दर प्रतिकिलो), पपई ३० ते ५० रु. नग, किवी ८० ते १०० रु. बॉक्स, कलिंगड ८० ते १०० रु. नग, अननस ६० ते १०० रु. नग.**

> **फळे खरेदीकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. सध्या विविध देशी-विदेशी फळांचा हंगाम जोरात असल्याने बाजारातही आवक वाढली आहे. दर स्थिर असल्याने ग्राहक फळे खाण्याचा आनंद घेत आहेत.**
> **- सुरज बागवान, फळ विक्रेता**

# पालकमंत्रिपदासाठी महायुतीत रस्सीखेच

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे जिल्ह्यात भाजपचे नऊ तर शिवसेना शिंदे गटाचे सहा आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्रिपद भाजपालाच मिळावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिंदे गट यांच्यात या पदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.



आगामी महापालिका निवडणुका स्वबळावर लढवून त्या ताब्यात घेण्यासाठी शिंदे गटाबरोबरच भाजपनेही कंबर कसली आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ठाणे जिल्ह्यात भाजपाचा स्ट्राईक रेट १०० टक्के असून त्यांचे नऊ आमदार निवडून आले आहेत. तर, शिंदे गटाचे सहा आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात भाजपचे वर्चस्व दिसून येत असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील वर्चस्व निर्माण व्हावे यासाठी भाजपा प्रयत्नशील आहे. विकासनिधी आणि प्रकल्पांच्या दृष्टीने पालकमंत्रिपद महत्त्वाचे असल्याने या पदासाठी भाजपाने जोर लावला असून शिंदे गट देखील यासाठी प्रयत्नशील आहे.

शिंदे सरकार सत्तेवर असताना ठाण्याचे पालकमंत्रिपद शिवसेनेच्या शंभुराज देसाई यांच्याकडे होते. त्याआधी २०१४ ते २०१९ आणि २०१९ ते २०२२ या कालावधीत शिंदे यांच्याकडेच पालकमंत्रिपद होते. शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी आल्यानंतर त्यांनी ठाण्याच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी देसाई यांच्याकडे सोपवली होती. आता शिंदे उपमुख्यमंत्री झाले आहेत. त्यांच्याकडे पालकमंत्रिपद देण्यात यावे, अशी सेनेची मागणी आहे. तसेच, जिल्ह्यात भाजपचे अधिक आमदार असल्याने पालकमंत्रिपद आम्हाला मिळावे, असा भाजप नेत्यांचा दावा आहे.

निवडक

## गुणीजन पुरस्कार सोहळा

**म्हसळा :** ललित कला फाऊंडेशन, ठाणे. व म्हसळा टाईम्स यांच्या संयुक्त विद्यमाने म्हसळा येथे न्यु इंग्लिश स्कुल, म्हसळा या सभागृहात गझल व काव्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे औचित्य साधुन श्री रविप्रभा मित्र संस्था, रायगड या संस्थेला गुणीजन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दिलीप कारखानिस, रोहिदास पोटे, रमेश पोटले, शितल मालुसरे, व्यंकटेश कुलकर्णी,पोलीस निरीक्षक संदिप कहाले, भालचंद्र दातार आदी मान्यवर उपस्थित होते.

## एसटीला विक्रमी उत्पन्न

**मुंबई :** दिवाळी सणाच्या निमित्ताने प्रवाशांचा चढ-उतार वाढल्यामुळे ९४१ कोटी रुपये इतके सर्वाधिक उत्पन्न नोव्हेंबर महिन्यात एसटी महामंडळाला मिळाले आहे. या महिन्यात एसटीने दररोज सरासरी ६० लाख प्रवाशांची वाहतूक करून सुमारे ३१.३६ कोटी रुपये उत्पन्न प्रतिदिन प्राप्त केले आहे. मागील वर्षाच्या याच काळातील उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न सुमारे २६ कोटी रुपयांनी जास्त आहे. विशेष म्हणजे मागील वर्षी दिवाळीच्या काळात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात आली होती.

## ४८ हजाराचा गंडा

**पनवेल :** बँकेतून बोलत असल्याचे भासवून एका महिलेने एका तरुणीला क्रेडीट कार्डला लागलेला प्रोटेक्शन चार्ज रद्द करण्याच्या बहाण्याने तिच्याकडून संपूर्ण माहिती घेवून तिच्या क्रेडीट कार्डमधून ४८ हजाराची रक्कम परस्पर काढून घेतल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे. फसवणूक झाल्याचे तरुणीच्या लक्षात येताच तिने याबाबत कळंबोली पोलीस ठाणे, सायबर क्राईम पोलीस ठाणे तसेच बँकेत याची तक्रार दाखल केली आहे.

## २ लाख चोरट्यांनी काढले

**पनवेल :** डॉक्टरच्या गहाळ झालेल्या मोबाईलमधून अज्ञात चोरट्यांनी २ लाखाची रक्कम काढून घेतल्याची घटना कळंबोलीमध्ये घडली आहे. नवीन पनवेल परिसरामधील डॉक्टर हे कळंबोली येथे कामानिमित्त गेले असताना बस स्टॅण्ड लगतच्या टाकीजवळ त्यांचा मोबाईल गहाळ झाला होता. सदर मोबाईल हा एका चोरट्याच्या हाती लागल्याने त्याने डॉक्टरांच्या मोबाईल गैरवापर करून त्यांच्या दोन खात्यातून इंटरनेटद्वारे २ लाख ४ हजाराची रक्कम परस्पर काढून घेतली.

## वृद्ध इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून वृद्ध इसम कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मरगु रिवोप्पा विटकर असे या वृद्ध इसमाचे नाव असून रंग काळा-सावळा, उंची अंदाजे ५ फुट ३ इंच, असून अंगात हिरव्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व काळ्या रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे. यांच्याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४५२३३३ वर संपर्क साधावा.

# शाळांना सहलीसाठी लागणार हमीपत्र



**। रायगड । प्रतिनिधी ।**

हिवाळ्यात शाळा-महाविद्यालयातून मोठ्या प्रमाणात सहली काढल्या जातात. यासाठी गडकिल्ल्यांना अधिक पसंती दिली जाते. शैक्षणिक सहलीसाठी जाणारे विद्यार्थी हुल्लडबाजी करीत असल्याने त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. यामध्ये सर्व निकषांचे काटेकोर पालन केल्याचे निश्चित झाल्यानंतरच शाळांना सहली काढता येणार आहेत. यामुळे शैक्षणिक सहलींदरम्यान घडणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी झाल्याचा दावा शिक्षण विभागाकडून केला जात आहे.संबंधित शाळांनी गटशिक्षण अधिकाऱ्यांना परवानगीचे पत्र दिल्यानंतर ते शिक्षणाधिकाऱ्यांना पाठवणे आवश्यक आहे. सहलीची परवानगी घेताना नियमांचे पालन केले जाईल, असे बाँडपेपरवरील हमीपत्र शाळांच्या मुख्याध्यापकांकडूनच घेण्यात यावे, अशा सूचना शिक्षण विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीची हमी आणि विद्यार्थ्यांच्या वर्तनाबद्दल कोणतीही शाश्वती घेण्यास शैक्षणिक संस्था तयार नसल्याने शैक्षणिक सहलींमध्ये शिस्त आल्याचे दिसून येत आहे. साधारण नोव्हेंबरपासून शैक्षणिक सहलींना सुरुवात होते. याचे नियोजन आधीपासून शैक्षणिक संस्था करतात. यासाठी शिक्षण विभागाची परवानगी, प्रवासासाठी एसटी गाडीचे बुकिंग करावे लागते; मात्र या वर्षी अशा परवानग्यांचे प्रमाणच अत्यल्प आहे. काही वर्षांपूर्वी मुरूडच्या समुद्रकिनाऱ्यावर सहलीला गेलेल्या पुणे येथील अबिदा इनामदार महाविद्यालयातील १४ विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. त्याचबरोबर दोन वर्षांपूर्वी किल्ले रायगडावर आलेले विद्यार्थी वाट चुकले होते. जंजिरा किल्ला, कुलाबा किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना दुखापतीला सामोरे जावे लागले होते. किल्ले रायगडावर पायरी मार्गाने जाणाऱ्या सहलींमधील विद्यार्थ्यांना त्रास जाणवत असतो. इनामदारमहाविद्यालयाच्यादुर्घटनेनंतर सहलीच्या आयोजनासंदर्भात शिक्षण उपसंचालकांनी परिपत्रक जारी केले होते. यात टप्प्याटप्प्याने अनेक सुधारणा झाल्या.

रायगड जिल्ह्यातील शाळांच्या शैक्षणिक सहली जशा बाहेर जातात त्याहीपेक्षा जास्त बाहेरील शैक्षणिक सहली रायगडमध्ये येत असतात. किल्ले रायगड, मुरूड येथील जंजिरा किल्ला, कुलाबा, कर्नाळा, सरसगड असे अनेक गडकिल्ले रायगडमध्ये आहेत. त्याचबरोबर अलिबाग, दिवेआगर, मुरूड, श्रीवर्धन येथील समुद्रकिनाऱ्यांवर सागरी जीवांचा अभ्यास करण्यासाठी शैक्षणिक सहली आणल्या जातात; मात्र अनेक वेळा विद्यार्थी हुल्लडबाजी करीत असल्याने दुर्घटना घडण्याचे प्रकार घडत असतात.

> विद्यार्थ्यांचे नाव, पत्ता, रक्तगट, नातेवाइकांचा मोबाईल क्रमांक अशी माहिती घेतली जाते. ज्या शाळा सर्व अटींचे पालन करण्याची हमी देतात, त्यांना परवानगी दिली जाते. हे पत्र गटविकास अधिकाऱ्यांकडून आमच्याकडे येते. नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी झालेली आहे, हे निश्चित झाल्यानंतरच परवानगी दिली जाते. शिक्षण विभाग गांभीर्याने घेत असल्याने काही वर्षांपासून शैक्षणिक सहलींमध्ये अपघातांचे प्रमाण खूपच कमी झाले आहे.
>
> – पुनिता गुरव, प्राथमिक शिक्षणाधिकारी, रायगड.

### आवश्यक परवानग्या

**शिक्षणाधिकाऱ्यांची अनुमती, प्राचार्यांचे शिफारसपत्र, पालकांचे संमतिपत्र, मुख्याध्यापकांचे स्टॅम्पपेपरवरील हमीपत्र, विद्यार्थ्यांची यादी, पालकांचे संपर्क क्रमांक, व्यवस्थापनाची परवानगी, विद्यार्थ्यांच्या विम्याचा तपशील, सहलीचे एकूण अंतर कालावधी, मार्गप्रथमोपचार पेटी, विद्यार्थी रक्तगट माहिती.**

## रिपब्लिकन सेनेतर्फे पनवेल बंद आवाहनाला प्रतिसाद



**। पनवेल । वार्ताहर ।**

परभणी जिल्ह्यात पोलिसी अत्याचारात शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ आज रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी. आनंदराज आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते. याला पनवेलमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रिपब्लिकन सेना (आनंदराज आंबेडकर) यांच्या वतीने पनवेलमध्ये बंद पुकारण्यात आला. यामध्ये जिल्हाध्यक्ष संतोष पवार, सुभाष गायकवाड, पंचशिल शिरसाठ, जमील पठाण, सोहेब खत्रिका, आदनान अन्सारी आदी भीम अनुयायी सामील होते व त्यांनी दुकानदार बांधवांना आपले व्यवसाय बंद ठेवण्याचे आवाहन केले असता त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले की, शासनाने आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत, अटकेतील सर्व आंदोलकांची सुटका करून गुन्हे मागे घ्यावेत, अमानुष मारहाण करणाऱ्या पोलिसांवर, गावगुंडांवर कारवाई व्हावी तसेच शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करावे आदी मागण्या त्यांनी शासन दरबारीकरण्यात आल्याचेसांगितले. यावेळी सत्ताधारी महायुती विरोधात निषेधाच्या घोषणासुद्धा देण्यात आल्या.

## स्त्री शक्ती जनजागृती कार्यक्रम



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वेश्वी अलिबाग येथील महिला सक्षमीकरण कक्ष आणि जिल्हा महिला व बालविकास कार्यालय रायगड अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री शक्ती जनजागृती कार्यक्रम पी.एन.पी. महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मोहिनी वाघमारे, स्मिता म्हात्रे व प्रकाश पवार, डॉ.नम्रता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना स्त्री जागृतीविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महिला सुरक्षेविषयी मोबाईलवरून ऑनलाईन संरक्षण कसे मिळवावे, याविषयी माहिती देत विद्यार्थिनींशी सुसंवाद साधला. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. नम्रता पाटील यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय वक्तव्य करून स्त्री सुरक्षिततेविषयी अशा कार्यक्रमांची समाजाला खऱ्या अर्थाने गरज आहे असे आपले मत व्यक्त करत विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख प्रा. केतकी पाटील यांनी केले तसेच आभार प्रदर्शन महिला विकास व ग्रंथालय विभाग प्रमुख कांचन म्हात्रे यांनी केले.

## सुरक्षा रक्षक मंडळात निरीक्षक पद रिक्त

**पनवेल:** रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे कार्यालय खांदा कॉलनीत आहे. या ठिकाणी निरीक्षक हे पद रिक्त असल्याने सुरक्षारक्षकांच्या अडचणीत भर पडत आहे. त्यामुळे सुरक्षारक्षकांना कोणी वाली नसल्याचे दिसत आहे. रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात पदभार सांभाळत असलेल्या निरीक्षक मारुती पवार यांची काही दिवसांपूर्वी बदली होऊन त्यांच्या जागी नियुक्त झालेल्या प्रमोद सावंत हे मंडळात फक्त एक आठवडा थांबुन ते सानपाडा मंडळाच्या निरीक्षक पदावर निघून गेले. त्यामुळे रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाला सद्यस्थितीत निरिक्षकपदी कोणी नसल्याने, मंडळाच्या नोंदित सुरक्षा रक्षकांना कोणी वाली नसल्याचे दिसत आहे.

## पोलिसांनी वाचवले प्राण

### घरगुती भांडणातून आत्महत्या करत होता इसम

**। पनवेल । वार्ताहर ।**

घरगुती भांडणाचा राग येऊन एक इसम आत्महत्येचा प्रयत्न करत असल्याच लक्षात येताच वाहतूक पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्या व्यक्तीचे प्राण वाचवले आहेत.

सोमवारी (दि.१६) वाहतूक विभागाचे उपनिरीक्षक संजीव शिंदे, पोलीस हवालदार संजय गावडे, पोलीस शिपाई प्रफुल पोकळे, चालक हवालदार सुरेश झिंजे सायन पनवेल महामार्गावर वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांवर स्पीड गनच्या सहाय्याने कारवाई करत होते. त्याचवेळी मार्गाच्या मधोमध उभा राहून एक इसम वेगात जाणाऱ्या वाहनासमोर स्वतःला झोकून देत आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. प्रसंगाचे गांभीर्य ओळखत कारवाई करत असलेल्या वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वेगाने जाणारी वाहन थांबवून मला जीव द्यायचा आहे. मला सोडा असे वारंवार सांगत आलेल्या त्या व्यक्तीला मार्गावरील सुरक्षित ठिकाणी आणले आणि आत्महत्या करण्याचे कारण विचारले. मुलांशी भांडण झाल्याने आपण हे पाऊल उचलत असल्याचे उत्तर संबंधित इसमाने पोलिसांना दिले. हवालदार संजय गावडे यांनी त्या व्यक्तीला आधार देत त्यांचे नाव आणि पत्ता विचारला असता असता त्यांनी त्यांचे नाव चंद्रकांत यादव राहणार असे सांगितले. त्यांच्या पत्नीला फोन करून त्यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

## माथेरानमध्ये आजी-माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन



**। माथेरान । वार्ताहर ।**

नेहमीच्या शाळेच्या अभ्यास क्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी दरवर्षी प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर स्कुल, नगरपालिका प्राथमिक शाळा सेंट झेव्हीयर स्कुल आणि अंगणवाडी शाळेतील मुलांना घेऊन वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात येत असते.

याच व्यासपीठावर सर्वांना आपल्या कला सादर करण्याची संधी प्राप्त होत असते. परंतु यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सुध्दा मोठया प्रमाणावर आपला सहभाग नोंदवल्याने न भूतो न भविष्यती असे स्नेहसंमेलन यावेळी प्रेक्षकांना अनुभवायला मिळाले.

सर्वांच्या अंगी असलेले सुप्त गुण यानिमित्ताने पहावयास मिळाले. एकांकिका, नृत्य, गाणी, कोळी नृत्य, कोकणी नाटक,कपल डान्स,लावणी असे विविध प्रकारचे कलाविष्कारांचे अप्रतिम सादरीकरण करण्यात आले.गायक पूजा केतकर, चंद्रकांत काळे, वसंत कदम, सुनील कदम, तबसुम शेख, स्मिता गायकवाड यांनी गायलेल्या अप्रतिम गाण्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

शिक्षक संघपाल वाठोरे यांच्या स्वरचित कविताना प्रेक्षकांनी उत्तम प्रकारे दाद दिली.

सलग दोन दिवस या स्नेहसंमेलनाचे आयोजन नगरपरिषदेच्या माध्यमातून उत्तम प्रशासक तथा कार्यक्षम मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी केले होते.

ीक्षक सदानंद इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तिन्ही शाळांचे शिक्षक यांच्या अथक प्रयत्नांतून स्नेहसंमेलन कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला आणि यास प्रेक्षकांनी सुध्दा या गुलाबी थंडीत सुध्दा भरभरून प्रतिसाद दिला. वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेच्या प्रांगणात गव्हाणकर शाळेचे विश्वस्त दादासाहेब गव्हाणकर आणि काही प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये कार्यक्रम पार पडला.

गव्हाणकर शाळेच्या माजी मुख्याध्यापिका कल्पना पाटील, शिक्षक संघपाल वाठोरे, विदुला गोसावी, दिनकर चव्हाण, नगरपालिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलीप आहिरे, लक्ष्मण जानू ढेबे, सचिन भोईर, संतोष चाटसे, अमोल अंधारे, साक्षी कदम, मनिषा चौधरी, किरण शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा ज्योती शिंदे, त्याचप्रमाणे सेंट झेव्हीयर शाळेच्या शिक्षकांच्या अथक परिश्रमामुळे स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

## भातशेतीऐवजी शेततळ्यांना पसंती

**। वडखळ । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यात एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील अनेक शेतकरी आता शेततळ्यांकडे वळले आहेत. भातशेती करताना उत्पन्नापेक्षा खर्च आणि मेहनत अधिक होत असल्याने शेतकरी अन्य उद्योग-व्यवसायाकडे वळत आहेत. उधाणाचे पाणी शिरल्याने अनेक ठिकाणची शेती पडीक आहेत. तर, काहींनी उत्पन्नवाढीसाठी शेतीला पूरक व्यवसाय सुरू केला आहे.

अनेक वर्षांपासून खारेपाटात शेतीबरोबरच मासेमारी व्यवसाय केला जातो. वातावरणातील बदल आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढावले आहे. मेहनत करून केलेली भातशेती वाया जात आहे.मशागत, पेरणी, लावणी, कापणी, झोडणी करून पिकवलेला भात घरात वा बाजारपेठेत नेईपर्यंत हजारो रुपये खर्च होतात; मात्र त्याला योग्य हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागते. तर, काही वेळा परतीचा पाऊस, वादळ, हवामान बदलाचा फटका सहन करावा लागतो. त्यामुळे शेतीकडे पाठ करून सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेत शेततळी खोदून लाखो रुपयांचे उत्पन्न घेणे अनेक शेतकरी पसंत करीत आहेत. तीन वर्षांत पेणमधील लागवडीखालील क्षेत्र २०० ते ३०० हेक्टरने कमी झाले आहे.

## सुधागड रिपाईने दिले पोलीस निरीक्षकांना निवेदन

**। पाली । वार्ताहर ।**

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूची तात्काळ चौकशी करण्यात यावी याकरिता सुधागड तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांनी पाली तहसीलदार उत्तम कुंभार आणि पाली पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांना निवेदन दिले.



परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली. त्यानंतर परभणी बंद दरम्यान शहरात दगडफेक जाळपोळच्या घटना घडल्या. ताब्यात घेतलेल्यांपैकी सोमनाथ सूर्यवंशी या वकिली व्यवसायाचे शिक्षण घेणाऱ्या युवकाला छातीत कळ येत असल्याने रुग्णालयात दाखल केल्यानंतर मृत्यू झाल्याची घटना परभणीत घडली आहे. या घटनेचा निषेध करत सुधागड तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने तालुकाध्यक्ष राहुल सोनावले यांच्या नेतृत्वाखाली पाली तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. त्याप्रसंगी तालुका अध्यक्ष राहुल सोनावले, भगवान शिंदे, सुरेश जाधव, दिलीप जाधव, नितेश गायकवाड, सुनील गायकवाड, महादू ओव्हाळ, देवदास जाधव, मिलिंद शिंदे, संतोष साळुंखे, सचिन भालेराव, योगेश गायकवाड, नितेश पवार, संतोष भालेराव, गणेश जाधव, आदी उपस्थित होते.

## महिला बेपत्ता

**। पनवेल । वार्ताहर ।**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

माधुरी ज्ञानदेव कदम (३३ रा.सेक्टर १ करंजाडे) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, उंची ५ फुट ४ इंच, अंगाने सडपातळ, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे काळे असून, अंगात गुलाबी रंगाची कुडती व काळ्या रंगाची लेगिझ तसेच निळ्या रंगाचे स्वेटर घातलेले आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पो.हवा. आर.के.केणी यांच्याशी संपर्क साधावा.

### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९
- आम्ही ऑनलाईन, ऑफलाईन आणि Gem पोर्टल वर AMC (वार्षिक देखभाल) सरकारी निम-सरकारी, खाजगी निविदा भरावयाचे कामे घेतो. Gem नोंदणी (Regn), सर्विस कॅटलॉग, विक्रेता नोंदणी इ. अधिक माहिती करीता संपर्क: 9987101960
- अलिबागमध्ये समुद्राजवळ 1BHK; 641 चौ.फुट विकणे आहे. संपर्क : ८४५९८९९६०३/९२८४०८४२९१
- एजनन्सीमधध्ये कामासाठी मुले पाहिजे- सेल्समन/डिलिवरीसाठी अरिहंत एजन्सी, पिंपळभाट, ८१४९३२२४४९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### १५ कोटी ८४ लाख रुपयांचा भरणा; ३१ डिसेंबरला संपणार मुदत

# 9 हजार 384 वीज ग्राहकांना ‘अभय’

**। रायगड । प्रतिनिधी ।**

थकबाकीमुळे वीजपुरवठा कायम स्वरुपी खंडित केलेल्या ग्राहकांसाठी महावितरणने आणलेल्या अभय योजनेचा कल्याण व भांडुप परिमंडलातील ९ हजार ३८४ जणांनी लाभ घेतला असून त्यांनी १५ कोटी ८४ लाख रुपयांचा भरणा केला आहे.

थकीत रकमेवर विलंब आकार व व्याजमाफीसह मूळ थकबाकीत ५ ते १० टक्क्यांची सवलत या ग्राहकांनी मिळवली आहे. तर यातील साडेपाच हजार जणांच्या मागणीप्रमाणे त्यांची घरे पुन्हा प्रकाशाने उजळण्यासाठी वीजजोडणी देण्यात येत आहे.

३१ डिसेंबरला या योजनेची मुदत संपत असून लाभापासून वंचित दोन्ही परिमंडलातील उर्वरित ग्राहकांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करून संधीचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

अभय योजनेनुसार मार्च-२०२४ अखेर किंवा तत्पूर्वी वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेले लघुदाब व उच्चदाब ग्राहक योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. थकबाकीची मुळ रक्कम एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पूर्णतः माफ होईल. योजनेतील सहभागी ग्राहकांना एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात मूळ थकबाकी भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तर थकबाकी एकरकमी भरणाऱ्या उच्चदाब ग्राहकांना मूळ थकबाकीवर ५ टक्के आणि लघुदाब ग्राहकांना १० टक्के अतिरिक्त सवलत मिळणार आहे.

मूळ थकबाकी एकरकमी अथवा ३० टक्के रक्कम भरुन योजनेत सहभागी होता येईल. त्यानंतर मागणीप्रमाणे तत्काळ पुन:र्जोडणी अथवा नवीन वीजजोडणी मिळेल. त्यासाठी पात्र ग्राहकांनी https://wss.mahadiscom.in/wss/wss या पोर्टलवर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे.

- **मूळ थकबाकीत ५ ते १० टक्क्यांची मिळाली सवलत**
- **वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांसाठी अनोखा उपक्रम**
- **ग्राहकांना ऑनलाईन अर्ज करण्याचे महावितरणचे आवाहन**

कल्याण परिमंडलातील ६ हजार ३९४ ग्राहकांनी अभय योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज केला आहे. यातील ५ हजार ४२७ ग्राहकांनी आत्तापर्यंत ६ कोटी ६४ लाख रुपयांचा भरणा केला असून त्यापैकी ३ हजार ५९६ जणांनी पुन:र्जोडणी अथवा नवीन वीजजोडणीची मागणी केली आहे.

भांडुप परिमंडलातील ४ हजार ४०८ ग्राहकांनी अभय योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज केला आहे. यातील ३ हजार ६९१ ग्राहकांनी आत्तापर्यंत ९ कोटी २० लाख रुपयांचा भरणा केला असून त्यापैकी १ हजार ९०० जणांनी पुन:र्जोडणी किंवा नवीन वीजजोडणीची मागणी केली आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल मालक श्री. राजीव गोपाळ खांडेकर यांचेकडुन कायम चे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे उंबरविरा व मौजे बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-चौ. मीटर | रुपये | पैसे |
| उंबरविरा | १९ | २ | ००-१७-६० | ०० | ७० |
| | १ | ९/क | ००-१६-०० | ०१ | २० |
| बीडखुर्द | २७ | १/ड | ००-१०-०० | ०० | २० |
| | २४ | ६/ब | ००-१५-२० | ०० | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, **ॲड. अल्पेश अनंत कराळे**
साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (ॲडव्होकेट)
(अंबिका नाका), पो. नेरळ, दिनांक :- १७/१२/२०२४
ता. कर्जत, जि. रायगड. मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकती संदर्भित जमीन मिळकतींचे विद्यमान मालक श्री. योगेश्वर बळवंत मढवी यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीन मिळकती ह्या पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीन मिळकतींचा व्यवहार अंतिमत: पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**- संदर्भित जमीनमिळकतींचे परिशिष्ट :-**

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | बिडवागळे, ता. अलिबाग, जि. रायगड. | १३८ | १-०३-३० पैकी ०-१५-१० | ०.२५ |
| २. | -॥- | १४० | ०-६३-२० | ३.०७ |

अलिबाग,
दिनांक १७/१२/२०२४.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट,
कृष्णवंदन - २, ब्राह्मणआळी, कन्याशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८२२५२८९३१.

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१८५/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो, माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. सादिक अ. शकूर काझी
वय : ६७ वर्षे, धंदा : शेती, अर्जदार
रा. मु. पो. हरकोल,
ता. माणगांव, जि. रायगड.
विरुद्ध
५. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत हरकोल,
ता. माणगांव, जि. रायगड. सामनेवाला
६. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. सादिक अ. शकूर काझी यांचे आजोबा कै. काजी अब्दुल रहिम महम्मद सईद फतागर हे दि. ०२/०६/१९८४ रोजी मौजे हरकोल, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ११/१२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयमध्ये अर्जदार यांचे आजोबा कै. काजी अब्दुल रहिम महम्मद सईद फतागर हे दि. ०२/०६/१९८४ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. सादिक अ. शकूर काझी यांचे आजोबा कै. काजी अब्दुल रहिम महम्मद सईद फतागर हे दि. ०२/०६/१९८४ रोजी मौजे हरकोल, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : सही/-
ता. : १६/१२/२०२४ कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१८३/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. कृष्णा रामा गोरेगांवकर
वय : ७८ वर्षे, धंदा : शेती,
रा. : मु. पो. चांदोरे, अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.
विरुद्ध
१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत चांदोरे,
ता. माणगांव, जि. रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. कृष्णा रामा गोरेगांवकर यांची आई कै. जिजाबाई रामा गोरेगांवकर ही दि. १७/१०/१९८१ रोजी मौजे चांदोरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १०/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयमध्ये अर्जदार यांची आई कै. जिजाबाई रामा गोरेगांवकर ही दि. १७/१०/१९८१ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. कृष्णा रामा गोरेगांवकर यांची आई कै. जिजाबाई रामा गोरेगांवकर ही दि. १७/१०/१९८१ रोजी मौजे चांदोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : सही/-
ता. १३/१२/२०२४ कार्यकारी दंडाधिकारी माणगाव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-चौ.मीटर | रुपये | पैसे |
| | २४ | १ | ००-१२-६० | ०१ | ७५ |
| ज्ञानेश्वर जगन्नाथ | २४ | २ | ००-२५-०० | ०३ | ६० |
| साळोखे व इतर ३ | २४ | ६/क | ००-०१-०० | ०० | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, **ॲड. अल्पेश अनंत कराळे**
दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, (ॲडव्होकेट)
हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), दिनांक :- १७/१२/२०२४
पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल

श्री. सुनिल एच. नागपाल, रा. खार (प), मुंबई ४०००५२ यांना खालील नमूद केलेली शेत जमिन मिळकत खरेदी करावयाची आहे. ती येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रू. पै |
|---|---|---|---|
| ४८ | ३ | ०.२९.३० | ३.७५ |
| ४८ | ४ | ०.१२.१० | १.३७ |

मालक १.श्री. विशाल विश्वास परदेशी, २. श्री. शैलेश मोतीराम परदेशी

वरील मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचे गहाण, बक्षीसपत्र, फरोक्त, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, मृत्युपत्र इत्यादी प्रकारचे कोणतेही करार केलेले असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर पाठवावी.

वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागावून आलेली हरकत आमचे अशिल विचारात घेणार नाही.

दिनांक: १५/१२ /२०२४

**ॲड. रविकर राघो गायकवाड,**
रा. नाना मास्तर नगर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९४२३३७८००२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे नेवाळी तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक दिपरत्ना पंकज गायकवाड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे नेवाळी तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील**
**जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १७ | १/ब | ०-१७-०० | २-४६ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन २१ (एकविस) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १७/१२/२०२४
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत सिवील कोर्टसमोर,
कर्जत, कर्जत, रायगड

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-१७४/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. मुहम्मद आसिफ मुसा अली गजगे
वय ४७ वर्षे, धंदा शेती, अर्जदार
रा. मु. पो. गोरेगांव
ता. माणगांव, जि. रायगड.
विरुद्ध
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. मुहम्मद आसिफ मुसा अली गजगे यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०६/०३/१९७७ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. ७३९/२०२४ ने दि. १७/०९/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयमध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०६/०३/१९७७ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे, तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी. विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. मुहम्मद आसिफ मुसा अली गजगे यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०६/०३/१९७७ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव सही/-
ता. १३/१२/२०२४ कार्यकारी दंडाधिकारी माणगाव

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १८४/२०२४

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. शिवाजी सुंदर सुतार
वय ५१ वर्षे, धंदा : शेती
रा. मु. पो. होडगांव, अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.
विरुद्ध
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत होडगांव सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदर अर्जदार श्री. शिवाजी सुंदर सुतार यांचे वडील कै. सुंदर कृष्णा सुतार हे दि. ०४/०५/१९८५ रोजी मौजे होडगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. २६२/२०२४ ने दि. २२/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयमध्ये अर्जदार यांचे वडील कै. सुंदर कृष्णा सुतार हे दि. ०४/०५/१९८५ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. शिवाजी सुंदर सुतार यांचे वडील कै. सुंदर कृष्णा सुतार हे दि. ०४/०५/१९८५ रोजी मौजे होडगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : सही/-
ता. १३/१२/२०२४ कार्यकारी दंडाधिकारी माणगाव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-चौ. मीटर | रुपये | पैसे |
| | १ | ३/अ | ००-०७-०० | ०० | ०५ |
| गणपत तुकाराम भोईर | १ | ३/ब | ०-२९-०० | ०० | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही /-
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, **ॲड. अल्पेश अनंत कराळे**
साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (ॲडव्होकेट)
(अंबिका नाका), पो. नेरळ, दिनांक :- १७/१२/२०२४
ता. कर्जत, जि. रायगड. मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. मनोज लक्ष्मणदास जगवाणी | ३७/९ | ००-३१-००<br>पो.ख. ००-०२-००<br>एकुण ००-३३-०० | ०-२५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/१२/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता- बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड. मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मी संतोष लक्ष्मण पाटील रा.पाटणोली नविन वसाहत, ता.पेण.जि.रायगड येथील रहिवासी असून स्व. सिताबाई महादेव कोळी यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी त्यांचे वारस नरेश महादेव कोळी, संतोष महादेव कोळी, नुतन विनायक कोळी रा. करंजा उरण जि.रायगड यांच्याकडून खालील मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

**पेण नगरपालिका हद्दित सर्व्हे नं. ३४ अ, हिस्सा नं. २, भुमापन क्र. ६९, क्षेत्र ६३९ चौ.मी. मिळकतीत बांधण्यात आलेल्या वेदांत बिल्डींग मधील मेंगझीम मजला वरील व्यापारी गाळा क्र. १७ क्षेत्र १३२ चौ.फुट. एवढी मिळकत खरेदी करणार आहे.**

वर वर्णन केलेली मिळकत मी स्वत: कायमस्वरूपी विकत घेत आहे. त्याबाबत वारसांकडून ताबा पावती करत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: सदरील मिळकतीची ताबा पावती करून घेणार असून वारस नोंद झाल्या नंतर सदरील मिळकत रजिस्टर्ड खरेदीखत करून माझ्या नावे करणार आहे व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण

दि. १७/१२/२०२४

**संतोष लक्ष्मण पाटील**
रा.पाटणोली नवीन वसाहत पेण
मो. ९६०४९१४३३३

## अलिबाग नगरपरिषद
### ई-निविदा सूचना

मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग-रायगड खाली नमूद केलेल्या कामांसाठी मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून ई-निविदा पद्धतीने वार्षिक निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | कामांचे नाव | इसारा रक्कम | कालावधी व वेळ | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | स्टॅन्ड पोस्ट कोळीवाडा ते गणेश तांडेल यांच्या घरापर्यंत ९० mm HDPE पाण्याची पाईप लाईन नवीन टाकणेबाबत. | २०००/- | १७-१२-२०२४ ते २७-१२-२०२४ निविदा फॉर्म देण्यात येईल. वेळ-सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत | ५००/- |

अटी/शर्ती :-
१. वरील कामाबाबतची अधिक माहिती पाणीपुरवठा विभागात संपर्क केल्यास त्वरीत देण्यात येईल.
२. तसेच निविदा फॉर्म अलिबाग नगरपरिषद पाणीपुरवठा विभागात मिळेल.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-58/23-24 RFX 7000034560 | Supply of various hardware materials at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs.18.55 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/- + GST Submission of bids from 17.12.2024 to 30.12.2024 up to 11:00 hrs, Opening date:- 30.12.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : -१७५/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. मोहमद हनीफ मुसा अली गजगे
वय ५१ वर्षे, धंदा : शेती, अर्जदार
रा. मु. पो. गोरेगांव
ता. माणगांव, जि. रायगड.
विरुद्ध
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. मोहमद हनीफ मुसा अली गजगे यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०७/०२/१९७३ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. ७०९/२०२४ ने दि. २९/०८/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०७/०२/१९७३ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी. विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. मोहमद हनीफ मुसा अली गजगे यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०७/०२/१९७३ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव सही/-
ता. १३/१२/२०२४ कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
### जाहीर नोटीस

दि.१५/१२/२०२४
जा.क्र.२४३४/२०२४

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ५ | ८९९/११ | तुलसी सोसा ए विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६१८ चौ.फूट सदनिका | सतीश राम मल्हार वैशाली सतीश मल्हार | शेखर चंद्रकांत पाटील, स्वाती शेखर पाटील |
| २ | ६ | ११९१/७ ते १५ व १६/१७ | श्री दत्तात्रय को.ऑप.हौ.सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला चौ.फुट दुकानगाळे | दि रायगड जिल्हा मध्य सह. बँक तर्फे वसुली अधिकारी श्री. लंकेश भगवान नागावकर | कांतीलाल मोरारजी काराणी |
| ३ | ३ | २९६ | पंतनगर चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ८९३ चौ.फुट घर | रविंद्र रामचंद्र मोकल | कमलेश जयरामदास तलरेजा |
| ४ | २ | १०४९/१८ | सुमंगल सोसा. चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ५२४ चौ.फुट सदनिका | मनोहर शंकर गोलतकर | चैताली दौलत पाटील |
| ५ | २ | १६९३.२ | शिवकुंज सोसा. चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ रा मजला ६१६ चौ.फुट सदनिका | सुभाष जयवंत वागळे | सुजीत यशोधरन कुंनूथाराईल शाहीस्ता शौकत हलडे |
| ६ | ६ | ७२४/२२ | बाफनाबाग बी विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला १२०० चौ.फुट पेंट हाऊस | बाबुभाई गुलाम हुसेन लाखानी गिताबेन बाबुभाई लाखानी | प्रमोद नामदेव घासे, गौरव प्रमोद घासे |
| ७ | ६ | २०८१/२४ | ओम वक्रतुंड सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ५ रा मजला चौ.फुट | मे. मंदार एन्टरप्रायझेस तर्फे पार्टनर रमेश शांताराम कापरे | कृष्णा सिताराम कडवे |
| ८ | ६ | २०८१/५ | ओम वक्रतुंड सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळ मजला चौ.फुट दुकान गाळा | मे. मंदार एन्टरप्रायझेस तर्फे पार्टनर रमेश शांताराम कापरे | योगेश कृष्णा कडवे |
| ९ | ४ | १७२४/१५ | सिगल रेसिडेन्सी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला चौ.फुट | निलेश मनोहर ढेरे, स्मिता निलेश ढेरे | महेश भरत शिळीमकर गौरी महेश शिळीमकर |
| १० | ६ | २०८१/६ | ओम वक्रतुंड सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळ मजला चौ.फुट दुकानगाळा | मे. मंदार एन्टरप्रायझेस तर्फे पार्टनर रमेश शांताराम कापरे | ऋषिकेश सिताराम गांधी वैभव सिताराम गांधी |
| ११ | १ | १३२०/२ | शंकर छाया बिल्डींग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ५७३ चौ.फुट | अरूणा पांडुरंग जाधव, जान्हवी जितेंद्र म्हात्रे निलिमा मिलिंद म्हात्रे | हर्षल पांडुरंग जाधव मनिष पांडुरंग जाधव |
| १२ | ४ | ९७१/४ | सई अपार्टमेंट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५३५ चौ. फूट | मंगला सुधांशू श्रीधनकर | राजेंद्रनाथ सदाशिव पाटील |
| १३ | ४ | ११९५/३ | ॲकॉन्स ट्रन्कुल को.ऑप.सोसा. | आर.सी.सी. बांधकाम १ मजला चौ.फुट | अंजनी आकाश उपाध्ये आकाश तुषार उपाध्ये | राजेंद्र महादेव नाईक |

**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

**श्री.ज्ञानेश्वर सालावकर**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत चेंढरे ता.अलिबाग**



# भारतीय महिलांचा दणदणीत विजय

**मानधना-जेमिमाहची आक्रमक खेळी**

**तितास साधूचा आक्रमक मारा**





**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय महिला संघाने रविवारी (दि.१५) वेस्ट इंडिज महिला संघाविरुद्ध टी-२० सामन्यात ४९ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह भारतीय महिला संघाने ३ सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली आहे. नवी मुंबईत झालेल्या या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजसमोर १९६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजला ७ बाद १४६ धावाच करता आल्या.

दरम्यान, लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी वेस्ट इंडिजकडून कर्णधार हेली मॅथ्यूज आणि कियाना जोसेफ यांनी डावाची सुरुवात केली. परंतु, मॅथ्यूज फार काही करू शकली नाही. तिला दुसऱ्याच षटकात १ धावेवर तितास साधूने बाद केले. यानंतर आलेल्या कॅम्पबेल (१३) हिचा अडथळा दीप्ती शर्माने दूर केला. त्यानंतर कियानाला आणि डिटेंड्रा डॉटिन यांच्या भागीदारीमुळे वेस्ट इंडिजने १० षटकांच्या आतच ८० धावा पार केल्या होत्या. परंतु, त्यांची भागीदारी तितास साधूनेच तोडली. कियानाने ३३ चेंडूत ४९ धावांची खेळी केली. चिनेल हेन्रीही ७ धावांवर बाद झाली.

यानंतर डॉटिन (५२) हिने अर्धशतक झळकावले. परंतु, अर्धशतकानंतर तिला तितास साधूनेच बाद केले. तिच्या पाठोपाठ ॲफी फ्लेचरही शुन्यावर बाद झाली, तर झायदा जेम्सलाही ५ धावाच करता आल्या. यानंतर शबिका गजनबीने नाबाद १५ धावा केल्या, तर मंदी मंग्रूने नाबाद २ धावा केल्या. अखेरीस २० षटकांनंतर वेस्ट इंडिज ७ बाद १४६ धावाच करू शकले. भारताकडून तितास साधूने सर्वाधिक ३ बळी घेतले, तर दिप्ती शर्मा आणि राधा यादव यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

तत्पुर्वी, वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे भारताने प्रथम फलंदाजी केली. भारताकडून स्मृती मानधना आणि उमा छेत्री यांनी चांगली सुरुवात केली. त्यांनी सलामीला अर्धशतकी भागीदारी केली. त्यांची भागीदारी करिश्मा रामहाराकने मोडली. तिने उमा छेत्रीला २४ धावांवर बाद केले. त्यानंतर मानधना आणि जेमिमाह रोड्रिग्स या दोघींनी आक्रमक खेळत ८१ धावांची भागीदारी केली. मात्र, स्मृती मानधना (५४) अर्धशतकानंतर बाद झाली. तिलाही रामहाराकनेच बाद केले. ती बाद झाल्यानंतरही ऋचा घोषही (१४) बाद झाली. यादरम्यान, जेमिमाह (७३) हिनेही तिचे अर्धशतक पूर्ण केले, पण ती अखेरच्या षटकात बाद झाली. अखेरीस कर्णधार हरमनप्रीत कौर (१३) आणि सजीवन सजना (१) नाबाद राहिल्या. भारताने २० षटकात ४ बाद १९५ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून करिश्मा रामहाराकने २ बळी घेतले, तर डिटेंड्रा डॉटिनने १ बळी घेतला.

# भारतीय संघावर पावसाचा व्यत्यय



**। ब्रिस्बेन । वृत्तसंस्था ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात द गॅबा स्टेडियमवर सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात पावसामुळे बराच व्यत्यय आला आहे. पहिल्या दिवसातही पावसामुळे केवळ १३.२ षटकांचा खेळ झाला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मात्र पूर्ण दिवस खेळ झाला. परंतु, तिसऱ्या दिवशी पुन्हा पावसाने खोडा घातला आहे. अखेर साम नाधिकऱ्यांनी तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने ४ बाद ५१ धावा केल्या होत्या.

तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने १०२ षटके आणि ७ बाद ४०५ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली होती. यावेळी ॲलेक्स कॅरे आणि मिचेल स्टार्क खेळत होते. मिचेल स्टार्क (१८) याला जसप्रीत बुमराहने माघारी धाडले. यानंतर कॅरेला नॅथन लायनने चांगली साथ दिली होती. त्याला मोहम्मद सिराजने त्रिफळाचीत केले. पुढच्याच षटकात कॅरे (७०) बाद झाला आणि ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ११७.१ षटकात ४४५ धावांवर संपला. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ६ बळी घेतले. तसेच, मोहम्मद सिराजने २ बळी, तर आकाश दीप आणि नितीश रेड्डी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

ऑस्ट्रेलियाचाडावसंपल्यानंतर तिसऱ्या दिवशी भारतीय संघ फलंदाजीला उतरला. भारताकडून यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल हे सलामीला फलंदाजीला उतरले. परंतु, जैस्वालला मिचेल स्टार्कने ४ धावांवर बाद केले. त्यानंतर तिसऱ्या षटकात शुभमन गिल (१) यालाही स्टार्कने बाद केले. त्यानंतर विराट कोहली (३) देखील स्वस्त्यात परतला. त्याच्या पाठोपाठ ऋषभ पंत (९) देखील बाद झाला. यानंतर केएल राहुल (५१) याला रोहित शर्मा साथ देण्यासाठी आला. परंतु, १७ षटकांनंतर पावसामुळे खेळ थांबला. त्यावेळी भारतीय संघाला ५१ धावाच करता आल्याने ऑस्ट्रेलियाकडे अद्याप ३९४ धावांची आघाडी आहे.

# मुंबईची मध्य प्रदेशवर मात

**। बंगळुरू । वृत्तसंस्था ।**

सय्यद मुश्ताक अली टी-२० चषक स्पर्धेचे विजेतेपद मुंबई संघाने पटकावले आहे. बंगळुरुला झालेल्या अंतिम सामन्यात मुंबई आणि मध्य प्रदेश संघ आमने-सामने होते. या सामन्यात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबई संघाने ५ गडी राखून विजय मिळवला आहे. यासह दुसऱ्यांदा सय्यद मुश्ताक अली चषकावर नाव कोरले आहे.



**दुसऱ्यांदा कोरले चषकावर नाव**

अंतिम सामन्यात मध्य प्रदेशने मुंबईसमोर १७५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. हे लक्ष्य मुंबईने १७.५ षटकात ५ गडी गमावत पूर्ण केले आहे. सामन्यात मुंबईकडून पृथ्वी शॉ आणि अजिंक्य रहाणे यांनी डावची सुरुवात केली होती. मात्र, पृथ्वी शॉ (१०) दुसऱ्याच षटकात बाद झाला. त्यानंतर श्रेयस (१६) छोटेखानी खेळी करून बाद झाला. यानंतर अजिंक्य रहाणे व सूर्यकुमार यादव यांच्यात अर्धशतकी भागीदारीही झाली. मात्र, वेंकटेश अय्यरने अजिंक्य रहाणे (३७) याला बाद केले. पाठोपाठ शिवम दुबे (९) देखील बाद झाला. सूर्यकुमार यादव (४८) बाद झाल्यानंतर मुंबई संघ दबावात आला होता. शेवटी सूर्यांश शडगे (३६) आणि अर्थर्व अंकोलेकर (१६) यांनी फटकेबाजी करत मुंबईला १७.५ षटकात विजय मिळवून दिला.

तत्पुर्वी, मुंबईने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे मध्य प्रदेश प्रथम फलंदाजीसाठी उतरले. मुंबईकडून शार्दुल ठाकूरने मध्य प्रदेशचे सलामीवीर अर्पित गौड (३) आणि हर्ष गवळी (२) यांना माघारी धाडले. त्यानंतर सुभ्रांशु सेनापती (२३), हरप्रीत सिंग (१५) आणि वेंकटेश अय्यर (१७) यांनी छोटेखानी खेळी केल्या. यानंतर रजत पाटीदारने राहुल बाथम याला साथीला घेत अर्धशतकी भागीदारीही केली. परंतु, राहुल १९ धावांवर बाद झाला. पाठोपाठ त्रिपुरेश सिंग (०) आणि शिवम शुक्ला (१) हे देखील बाद झाले. रजतने शेवटपर्यंत नाबाद राहत संघाला २० षटकात ८ बाद १७४ धावांपर्यंत पोहचवले.

# स्नेहल पालकरचे ‘सुवर्ण’ यश

**■ ओडिशा येथील राष्ट्रीय स्पर्धा खेळणार**

**। उरण । प्रतिनिधी ।**

पाचवी महाराष्ट्र राज्यस्तरीय मास्टर्स ॲथलेटिक्स स्पर्धा १४ आणि १५ डिसेंबर रोजी नाशिक येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष स्नेहल पालकर यांनी ३५ वर्षेवरील वयोगट मधील ८०० मीटर आणि १५०० मीटर धावणे या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले आहे. तर, ५ किलोमिटर धावणे या क्रिडाप्रकारात रौप्यपदक प्राप्त केले आहे.




याचबरोबरस्नेहलपालकरयांचे सहकारी अमित विचारे यांनी ४० वर्षांवरील वयोगटा मधील १५०० मीटर धावणे या क्रीडाप्रकारामधे सुवर्णपदक, तर ८०० मीटर धावणे आणि ५ किमी धावणे यामध्ये रौप्यपदक प्राप्त केले. तसेच, ५० वर्षांवरील वयोगटात ८०० मीटर आणि १५०० मीटरमध्ये रौप्यपदक प्राप्त केले आहे. तर, अमोल वळसंग यांनी ३५ वर्षेवरील वयोगटात १५०० मीटर आणि १० किमीमध्ये रौप्यपदक तर ५ किमीम ध्ये कांस्यपदक प्राप्त केले आहे. तसेच, मनीष खवले यांनी ५५ वर्ष वरील गटामध्ये उंचउडीत सुवर्णपदक तर लांबउडीत कांस्यपदक प्राप्त केले आहे.

या सर्व खेळाडूंची निवड मार्च महिन्यात ओरिसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी झालेली आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल समाजातील सर्व स्तरामधून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तसेच, त्यांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# नाणोरे शाळेचे यश




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

बीट स्तरावरील क्रीडा आणि व्यक्ती महत्व विकास स्पर्धेतील लहान गटाच्या नृत्य स्पर्धा प्रकारात नाणारेच्या उतेखोल शाळेने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. माणगाव नगरपंचायत हद्दीतील नाणोरे शाळेचा पट १५ असून या सर्व विद्यार्थ्यांनी या नृत्यात सहभाग घेतला होता. याबद्दल व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांचे विषेश कौतुक केले. यावेळी व्यवस्थापन अध्यक्ष अन्वी मासूक, उपाध्यक्ष शर्वरी शिगवण, सर्व सदस्य, पालक यांनी सभा घेऊन विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान केला आहे. मुख्याध्यापक वाटवे आणि व्यवस्थापन अध्यक्षांनी केंद्र प्रमुख शंकर शिंदे, विनया जाधव, दिनेश खडतर यांचा सत्कार केला.

# ॲथलेटिक्स उपखंडीय टूअरचे आयोजन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतामध्ये पहिल्यांदाच जागतिक ॲथलेटिक्स उपखंडीय टूअर ही प्रतिष्ठेची स्पर्धा पुढल्या वर्षी रंगणार आहे. भुवनेश्वरमध्ये पुढल्या वर्षी १० ऑगस्ट रोजी या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा कस लागणार आहे. भारतीय ॲथलेटिक्स संघटनेकडून (एएफआय) रविवारी (दि.१५) याबाबतची माहिती देण्यात आली. २०२५ मधील भारतातील स्पर्धांचे वेळापत्रक याप्रसंगी जाहीर करण्यात आले आहे.




यावेळी एएफआयचे अध्यक्ष अदिल सुमारीवाला म्हणाले की, पुढल्या वर्षी १३ ते २१ सप्टेंबर या कालावधीत टोकियोमध्ये जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याआधी ऑगस्ट महिन्यात भारतामध्ये जागतिक ॲथलेटिक्स उपखंडीय टूअर (ब्राँझस्तरावरील जागतिक इव्हेंट) ही मानाची स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. भारतातील खेळाडूंना या स्पर्धेद्वारे सराव करता येणार आहे. तसेच, ‘क’ गटातील जागतिक क्रमवारी गुणही कमवता येणार आहेत.

तसेच, एएफआयकडून सांगण्यात आले की, भारतामध्ये नवी दिल्ली येथे २००४मध्ये जागतिक अर्ध मॅरेथॉन अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर आता जागतिक स्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धा भारतात होत आहे. यामुळे भारतातील ॲथलीट यांना प्रगतीच्या दिशेने पाऊल ठेवता येणार आहे. याचबरोबर पुढल्या वर्षी भालाफेक या खेळाच्या मोठ्या स्पर्धेच्या आयोजनाची तयारी करण्यात येत आहे. नीरज चोप्रा याने ऑलिंपिकमध्ये पदकांची कमाई केल्यानंतर भारतामध्ये भालाफेककडे पावले वळलेल्या खेळाडूंच्या संख्येत वाढ होत आहे. सध्या ८० मीटरचा टप्पा ओलांडणारे भारतामध्ये अर्धा डझनपेक्षा अधिक खेळाडू आहेत. भालाफेक या खेळाचा प्रसार व प्रचार होण्यासाठी स्पर्धेच्या आयोजनासाठी पावले उचलण्यात येणार आहेत.

# बीटाच्या क्रीडा स्पर्धा संपन्न



**माणगाव :** राजिप नियोजित माणगाव तालुक्यातील साई बीटाच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा मोर्बा येथे शुक्रवारी (दि.१३) संपन्न झाल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच शौकत रोहेकर व मुख्याध्यापक खालिद अहमद खान यांनी केले. सर्वप्रथम व्यक्तिमत्व विकास अंतर्गत समूहगीत गायन स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर पारंपारिक गीत (नृत्य स्पर्धा) घेण्यात आली. या कार्यक्रमात वैयक्तिक स्पर्धेमध्ये दोरी उड्या (मुली), बेचकीने नेम धरणे (मुलं), माती कामातून वस्तू बनवणे या स्पर्धा घेण्यात आल्या. तर, मैदानी खेळामध्ये लगोरी (मुलं) तर लंगडी (मुली) या स्पर्धा झाल्या. या सर्व स्पर्धांमध्ये साई बीटातील सर्व शाळांनी सहभाग नोंदविला होता.

**धनुर्विद्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार**

# रायगडच्या धनुर्धरांची अचूक नेमबाजी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्यातर्फे फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ रायगड यांच्या यजमानपदाखाली १४व्या महाराष्ट्र राज्य फिल्ड इनडोअर धनुर्विद्या निवड चाचणी स्पर्धा अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलात पार पडल्या आहेत. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील चौदा धनुर्धरांची निवड राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.**

अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे १४ आणि १५ डिसेंबर या दोन दिवसांत देशाचे उज्वल भविष्य असणाऱ्या धनुर्धरांचे अचूक वेध पहायला मिळाले. यावेळी, एकास एक सर्रास कामगिरी करणारे धनुर्धर जवळून पाहण्याचा अनुभव रायगडकरांना आला. शिस्तबद्धता, एकाग्रता आणि संयमाचे समीकरण असणारी हि स्पर्धा रायगडकरांसाठी पर्वणी ठरली. दरम्यान, या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते पार पडले. स्पर्धेचा बक्षीस समारंभ दत्ताजीराव खानविलकर ट्रस्टचे अध्यक्ष अमर वार्डे यांच्या हस्ते संपन्न झाला.

**रायगडच्या १४ धनुर्धरांची निवड**

**रायगड जिल्ह्यातील १४ धनुर्धरांची निवड राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. यामध्ये दहा वर्षाखालील वयोगटात मुलींमध्ये रुधिरा जाधव, स्वाहा कदम, क्षितिका कदम, मुलांमध्ये अर्जुन म्हात्रे आणि अभिमन्यू मिश्रा या पाच धनुर्धरांनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपले तिकीट पक्के केले आहे. १४ वर्षाखालील वयोगटात मुलींमध्ये तनिषा वर्तक, मुग्धा वैद्य, सई पिळणकर तर मुलांमध्ये आशय आंग्रे, दिव्यनिल दत्ता, अंश पराडकर, आरव हुलवान आणि अथर्व पाटील या धनुर्धरांनी प्रतिस्पर्ध्यांना मात देत पदकाला गवसणी घातली आहे. वरिष्ठ वयोगटात लाभेश तेली या धनुर्धराने प्रतिस्पर्धी खेळाडूंवर अचूक नेमबाजीने मात केली.**







या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १४ धनुर्धरांची निवड राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी करण्यात आली असून लखनौ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या धनुर्धरांना फिल्ड आर्चरी असोसिएशन महाराष्ट्र अध्यक्ष सीताराम चव्हाण, महासचिव सुभाषचंद्र नायर, उपाध्यक्ष रितिका नायर, रायगडचे सचिव संतोष जाधव, मिलिंद पांचाळ, वैभव सागवेकर, अजिंक्य अडकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)